www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले | उपसंपादक - श्री विलास गायकवाड | कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे | निवासी संपादक- श्री राकेश पाटील | सह संपादक - श्री मुकुंद कांबळे | महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 | अंक : ५५ | सोमवार, ०३ नोव्हेंबर २०२५ | किंमत : ४ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514




# बळीराजाला सुखी, समाधानी ठेव!



## पांडुरंगचरणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे साकडे !

**दैनिक युवक आधार**
**पंढरपूर**

श्री विठ्ठल रुक्मिणी च्या दर्शनासाठी भाविकांना कमी वेळ लागावा तसेच दर्शन रांगेमध्ये पाणी, बैठक व्यवस्था यासह सर्व प्रकारच्या सुविधा मिळाव्या याकरिता तिरुपतीच्या धर्तीवर दर्शन मंडप निर्माण करण्यासाठी राज्य शासनाने 130 कोटीचा निधी मंजूर केलेला होता. या कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून प्रशासनाने हे काम अत्यंत जलद गतीने पूर्ण करून भाविकांना दर्शनाची सुविधा सुलभ व कमी वेळेत उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

कार्तिकी यात्रा 2025च्या अनुषंगाने श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यांच्या पत्नी लता एकनाथ शिंदे व मानाचे वारकरी रामराव वालेगावकर, सुशिलाबाई रामराव वालेगावकर यांच्या हस्ते पार पडली. यावेळी मंदिर समितीच्या वतीने करण्यात आलेल्या सत्कारप्रसंगी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, खासदार श्रीकांत शिंदे, आमदार सर्वश्री समाधान आवताडे, अभिजीत पाटील, तानाजी सावंत, बापूसाहेब पठारे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर व समिती सदस्य तसेच समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, पंढरपूर येथे आषाढी व कार्तिकी वारीमध्ये लाखो भाविक श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येतात. भाविकांना दर्शन रांगेत चांगल्या सुविधा मिळण्याबरोबरच कमी वेळेत दर्शन होण्यासाठी दर्शन मंडप काम गतीने होणे गरजेचे आहे यासाठी प्रशासनाने दक्षता घ्यावी. श्री विठ्ठल रुक्मिणीचे व्हीआयपी दर्शन बंद केलेले असून वारकऱ्यांना लवकर दर्शन मिळत आहे. कारण वारकरी हाच व्हीआयपी असल्याचे त्यांनी सांगून वारकऱ्यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, म्हणून प्रशासनाने चांगले नियोजन केल्याचेही त्यांनी सांगितले.राज्यातील शेतकऱ्यावर मोठे संकट आलेले आहे. शेती पिकांचे खूप मोठे नुकसान झाले आहे. अशा संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून शेतकऱ्यांना तातडीची मदत म्हणून शासनाने 32 हजार कोटीचे पॅकेज



जाहीर केलेले आहे. तसेच शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी यासाठी समितीची स्थापना केल्याची माहिती उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. बळीराजावर आलेले अरिष्ट दूर कर, त्यांना सुख व समाधानाचे दिवस येऊ दे, असे साकडे पांडुरंगाला घातले असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.राज्य परिवहन महामंडळ मार्फत मानाच्या वारकऱ्यांना वर्षभर एसटीने प्रवास करण्यासाठी मोफत पास दिला जातो. यापुढील काळात या वारकऱ्यांना कायमस्वरूपी एसटीचा मोफत पास देण्यात येणार आहे. तसेच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडे असलेली महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास मंडळाची जागा आणखी पुढे तीस वर्ष राहील असा करार लवकरच करण्यात येणार आहे. तसेच सर्व्हे नंबर 161 मधील जागा मंदिर समितीला देण्याबाबतचा प्रस्ताव पुढील महिन्यात नगर विकास विभागाला सादर करावा, याबाबतचाही निर्णय तात्काळ घेण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.आपल्या राज्याने सर्व क्षेत्रात उत्कृष्ट काम करून प्रथम क्रमांकावर राहावे, विविध कल्याणकारी योजनाची प्रभावी अंमलबजावणी करून राज्याच्या विकासाची पताका सर्वत्र फडकावी यासाठी शासन कटिबद्ध आहे. त्याप्रमाणेच चंद्रभागा नदीसह सर्व नद्यांच्या प्रदूषण मुक्तीसाठी ठोस कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. यावर्षीच्या कार्तिकी वारीमध्ये भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करण्यासाठी अतिरिक्त पाच कोटींचा निधी तात्काळ उपलब्ध करून देण्यात आल्याचेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगून राज्यातील सर्व भाविकांना कार्तिकी एकादशी निमित्त शुभेच्छा दिल्या तसेच मानाच्या वारकऱ्यांचे अभिनंदन केले व या यात्रा कालावधीत पालकमंत्री, जिल्हाधिकारी, स्थानिक आमदार व स्थानिक प्रशासन यांनी चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. दरम्यान यावर्षीपासून प्रथमच शालेय विद्यार्थ्यांचीही मानाचे मानकरी म्हणून निवड करण्यात आली. मानसी आनंद माळी व आर्य समाधान थोरात यांना हा मान मिळाला.प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, त्यांच्या पत्नी लता एकनाथ शिंदे तसेच मानाचे वारकरी रामराव वालेगावकर व त्यांच्या पत्नी सुशिलाबाई वालेगावकर यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा करण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री व सर्व मान्यवरांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने तयार केलेल्या दैनंदिनी 2026 चे प्रकाशन करण्यात आले.मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी प्रस्ताविक केले तर कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी आभार मानले.

## वंचित बहुजनआघाडीची स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या संदर्भात केंद्रीय सदस्या सविताताई मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक संपन्न



**दैनिक युवक आधार**
**जालना(अशोक ठोके)**

जालना येथे वंचित बहुजन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व नगरपालिका निवडणुकांच्या संदर्भात वंचित बहुजन आघाडीच्या केंद्रीय कार्यकारिणीतील सदस्या सविताताई मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक पार पडली. या बैठकीत परतुर तालुक्याच्या वतीने तालुका अध्यक्ष रविंद्र भदर्गे व परतूर शहराच्या वतीने शहर अध्यक्ष राहुल नाटकर यांनी परतूर नगर परिषद 2025 चा तालुक्याचा व शहराचा अहवाल पक्षाकडे सादर केला. जालना जिल्हा अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल रामप्रसाद थोरात सर यांचा सत्कार वंचित बहुजन आघाडी जालना (पश्चिम) तर्फे करण्यात आला. सत्कार वंचित बहुजन आघाडी राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्या तथा जालना जिल्हा समन्वयक आदरणीय सविताताई मुंडे ,जिल्हा निरीक्षक तथा प्रदेश उपाध्यक्ष प्रा.नागोराव पांचाळ सर,यांचे शुभ हस्ते झाला.यावेळी उपस्थित मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके, जालना पश्चिमचे जिल्हाध्यक्ष डेव्हिड घुमारे, महिला अध्यक्षा रमाताई होरशील,जिल्हा महामंत्री प्रशांत कसबे,डॉ.किशोर त्रिभुवन, चोखाजी नाना सौंदर्य, परमेश्वर खरात,जमीर भाई शेख व सर्व जिल्हा पदाधिकारी ,परतुर तालुका अध्यक्ष रवींद्र भदर्गे, शहराध्यक्ष राहुल नाटकर, स्वप्निल पहाडे, दीपक हिवाळे, महादेव पैठणे व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## आपला माणूस" दिलीप आमले यांचा प्रेरणादायी उपक्रम - आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व कपड्यांचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**नेरुळ वार्ताहर :** सामाजिक संस्था व दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने त्रिमूर्ती समूहाच्या वतीने जिल्हा परिषद आदिवासी शाळेत शालेय साहित्य व कपड्यांचे वाटप करण्यात आले.

गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, दारूबंदी तसेच धार्मिक वारकरी

त्रिमूर्ती समूहाच्या वतीने सामाजिक संस्था व दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने जिल्हा परिषद आदिवासी शाळेत शालेय साहित्य व कपड्यांचे वाटप करण्यात आले.

गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, दारूबंदी तसेच धार्मिक वारकरी संप्रदायाचा प्रसार करत असतानाच शिक्षणाच्या क्षेत्रातही श्री. दिलीप किसनराव आमले यांनी "आपला माणूस" या तत्त्वावर आधारित कार्य गेली २० वर्षे मोफत मार्गदर्शनाद्वारे सुरू ठेवले आहे.



शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, पट्टी, पेंड, कंपास बॉक्स आदी शालेय साहित्य तसेच नागरिकांना कपड्यांचे वाटप करण्यात आले.या वेळी विद्यार्थिनी लक्ष्मी हिचा वाढदिवस विशेष साजरा करण्यात आला. सर्व विद्यार्थी अत्यंत आनंदी दिसत होते.

सौ. संगीताताई दिलीप आमले यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून अभ्यास वेळेत पूर्ण करावा, चांगल्या सवयी लावाव्यात, नियमित व्यायाम करावा आणि व्यसनाधीन व्यक्तींच्या संपर्कात न जाण्याचा सल्ला दिला.

या प्रसंगी श्री. नामदेव कोळेकर, सौ. संगीता दाते, श्री. शेळके सर (मुख्याध्यापक) तसेच १ ली ते ५ वीतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

"एक हात मदतीला" या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला अनेक सामाजिक संस्था व दानशूर व्यक्तींचे सहकार्य लाभले.

"या सहकार्यामुळेच शैक्षणिक उपक्रम आर्थिक व वस्तूरूपाने यशस्वी होत आहेत," असे त्रिमूर्ती व्यसनमुक्ती जनजागृती प्रमुख श्री. दिलीप किसनराव आमले यांनी सांगितले.

## टायरच्या कंटेनरमध्ये परदेशी सापाचा प्रवेश : उरणमधील हिंद कंटेनर टर्मिनलमध्ये 'कॉर्न स्नेक' आढळला

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील हिंद कंटेनर टर्मिनल येथे एका टायर कंटेनरमध्ये एक परदेशी जातीचा साप आढळून आला आहे. या सापाची ओळख 'कॉर्न स्नेक' किंवा 'रेड रॅट स्नेक' अशी झाली असून हा उत्तर अमेरिकन खंडातील एक विदेशी प्रजातीचा साप आहे.मिळालेल्या माहितीनुसार, हा कंटेनर परदेशातून आयात केलेल्या टायरसह उरण बंदर परिसरात पोहोचला होता. तपासणीदरम्यान कर्मचाऱ्यांच्या नजरेस एक वेगळ्या नारंगी रंगाचा, आकर्षक पट्टेरी साप दिसल्याने व्यवस्थापना तर्फे त्वरित बचाव कार्यासाठी फ्रेंड्स ऑफ नेचर फॉन संस्थेच्या स्वप्नील म्हात्रे या स्वयंसेवकास कळविण्यात आले.



सदर साप बिनविषारी असून मानवाला कोणताही धोका नसतो. या जातीचे साप प्रामुख्याने पाळीव स्वरूपात ठेवले जातात. तथापि, भारतात अशा परदेशी प्रजातींची उपस्थिती पर्यावरणीय संतुलनाच्या दृष्टीने चिंताजनक मानली जाते. कारण ते इथल्या स्थानिक प्रजातींसाठी प्रतिकूल ठरू शकतात. त्यासाठी त्यांना त्यांच्या मूळ ठिकाणी म्हणजे जेथून आलेत तिथे पाठविणेच योग्य असते.या घटनेनंतर फ्रेंड्स ऑफ नेचर च्या जयेश गायकवाड या फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) च्या बचावकर्त्याने घटनास्थळी जाऊन साप सुरक्षितरीत्या पकडून त्याची काळजी घेतली. पुढील कारवाईसाठी वनविभागाकडे सदर 'साप' सुपूर्द करण्यात येणार आहे. महाराष्ट्र वनविभाग, वनपरिक्षेत्र अधिकारी, उरण एन. जी. कोकरे ह्यांच्याशी संपर्क करून वनविभाग पुढील कार्यवाही करत आहे.

## रत्नागिरी जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला



**दैनिक युवक आधार**

रत्नागिरी जिल्ह्यातील पावसाचा जोर वाढला आहे. सलग दोन दिवस पडलेल्या पावसाने जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. तसेच नद्यांच्या पाणी पातळी देखील चांगलीच वाढ झाली आहे. लांजा येथे वहाळ तुंबल्याने अनेकांच्या घरात पाणी शिरल्याने नागरिकांची धावपळ उडाली. रत्नागिरी जिल्ह्यात शुक्रवार पासूनच पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. या पावसामुळे जिल्ह्यातील भात व नाचणी पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. कापण्यात आलेले पीक उन्हात वाळत घातलेले असताना पुन्हा पावसामुळे पिकाची नासाडी होवू घातली आहे.

जिल्ह्याच्या सर्व भागात पावसाचा जोर वाढल्याने नद्या नाल्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. जिल्ह्यात असलेले कृत्रीम धबधबे पुन्हा कार्यान्वीत झाले आहे. जिल्ह्यात पावसाचा जोर कायम राहिल्यास पुन्हा पूरस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# युवा पत्रकार मुझम्मील काझी यांना 'कोकण रत्न पदवी' जाहीर

## स्वतंत्र कोकणराज्य अभियानाचे संस्थापक संजय कोकरे यांनी केली अधिकृत घोषणा

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

कोकणातील डिजिटल पत्रकारितेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रश्न धडाडीने मांडणारे आणि 'ग्रामीण वार्ता' या न्यूज डिजिटल मीडियाचे संस्थापक, उक्षी गावचे सुपुत्र, गाव विकास समिती रत्नागिरी जिल्हा या संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष मुझम्मील काझी यांना प्रतिष्ठेच्या 'कोकण रत्न पदवी'ने सन्मानित करण्यात येणार आहे.

स्वतंत्र कोकणराज्य अभियानाचे संस्थापक संजय कोकरे यांनी नुकतीच याची अधिकृत घोषणा केली आहे. मुझम्मील काझी यांच्या आठ वर्षांच्या अथक आणि प्रभावी पत्रकारितेची दखल घेऊन त्यांची या सन्मानासाठी निवड करण्यात आली आहे.गेली आठ वर्षे मुझम्मील काझी यांनी डिजिटल माध्यमांचा अत्यंत प्रभावी वापर केला आहे. त्यांनी कोकणातील ग्रामीण भागातील अनेक मूलभूत प्रश्न, स्थानिक स्तरावरील समस्या आणि प्रशासकीय कामकाजातील त्रुटी अत्यंत परखडपणे आणि निःपक्षपातीपणे समाजासमोर आणल्या. तळागाळातील सामान्य नागरिकांच्या समस्यांना प्रभावीपणे वाचा फोडल्यामुळे अनेक वेळा प्रशासनाला या प्रश्नांची गंभीर दखल घेणे भाग पडले आहे.विविध युट्यूब चॅनेलमध्ये यशस्वीपणे जबाबदारी पार पाडल्यानंतर मुझम्मील काझी यांनी स्वतःच्या 'ग्रामीण वार्ता' या न्यूज डिजिटल मीडियाची सुरुवात केली. 'ग्रामीण वार्ता'च्या माध्यमातून त्यांनी आजवर अनेक समस्यांचा पाठपुरावा करत गरजू लोकांना न्याय मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. या संपूर्ण प्रवासात त्यांच्या सहकाऱ्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. त्यांच्या कार्याची महती आणि व्यापकता लक्षात घेऊनच 'स्वतंत्र कोकणराज्य अभियाना'च्या वतीने त्यांना 'कोकण रत्न पदवी' प्रदान करण्यात येणार आहे.



या पदवी समारंभाचे आयोजन शनिवार दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत मुंबई मराठी पत्रकार भवन, आझाद मैदान शेजारी, मुंबई येथे करण्यात आले असून, तो समारंभ संस्थेचे संस्थापक संजय कोकरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार आणि संपादक सचिन कळझुनकर सर उपस्थित राहणार आहेत. तसेच या संस्थेचे मुंबई अध्यक्ष धनंजय कुवेसकर, खजिनदार राजेंद्र सुर्वे, नेते सुभाष राणे आणि सल्लागार दिलीप लाड हेसुद्धा या कार्यक्रमाला हजर राहणार आहेत.

# घाटंजी काँग्रेस मराठी माणसाला उमेदवारी देणार का?

## कि पुन्हा तेंच हिंदी भाषिक उमेदवारच हित जोपासेल

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधि. महेश पेन्दोर**

**घाटंजी:** सर्वत्रिक निवडणुकीचे वारे सुरु झाले असताना सर्वच पक्ष व नेते आप आपली बाजू मांडताना दिसत आहे. काही दिवसावरच ही निवडणूक येऊन थांबली असली तरी.भारतीय जनता पार्टीने अजून पर्यंत उमेदवारी जाहीर जरी केली नसली तरी प्रथम मराठी उमेदवाराला प्राधान्य देखील देण्याचे समजल्या जात आहे. परंतु ज्या भारतीय जनता पार्टीची लढत ही काँग्रेसशी आहे असे जरी दिसून येत असले तरी पण हे चित्र अध्याप जरी स्पष्ट झाले नाही. परंतु ज्या घाटंजी शहरात मराठी माणसाचे अस्तत्व असून देखील मराठी माणसाच्या राजकारणला काँग्रेस का स्वीकारत नाही?हा प्रश्न जनसामान्यात पडला आहे.



एकी कडे भारतीय जनता पार्टीला हिंदी भाषिकाच्या पक्ष म्हणून भाषणात ओरडून सांगणारे काँग्रेसचीं पार्टीची वरीष्ठ नेते व असणारी मंडळी मात्र आज घाटंजी शहरातील एका हिंदी भाषिक भायाला उमेदवारी देण्याचा विचार करत आहे. केळापूर आर्णी विधानसभा क्षेत्राचे माजी मंत्री तथा ज्यांनी कित्येक वर्ष या मतदार संघांचे नेतृत्व केले. ते माजी मंत्री देखील त्याच हिंदी भाषिक उमेदवाराला उमेवारी द्या असा हट्टहास पकडून आहे असे समजल्या जाते. या काँग्रेस पक्षात कित्येक नवीन युवा व सुशिक्षीत चेहरे असून देखील हिंदी भाषिक भाया चा काँग्रेस शब्द पूर्ण करणार का?

**"परंपरा काँग्रेसचीं एकचं आमच्यासाठी मराठी माणसापेक्षा हिंदी भाषिक नेक "किती दिवस पक्ष दावणीला बांधणार**

केळापूर मतदार संघात काँग्रेसचे सर्वोच्च म्हणून माजी सामाजिक न्याय मंत्र्याला पक्ष श्रेष्ठि जिल्हातील निर्णय घ्यायला लावतात ते पक्षाच्या हिताचे निर्णय न घेता जे आपल ऐकणार विधानसभेत मला आर्थिक मदत करणार असे.. भैय्या...भाई...भाया...यांच्या दावणीला बाधलेला पक्ष अजून किती दिवस हिंदी भाषीकाच्या दावणीला बांधणार अशी जन भावना व प्रतिक्रिया घाटंजीतील मराठी माणसाच्या मुखी एकण्यासं मिळत आहे.

**खासदार प्रतिभाताईचीं भूमिका घाटंजी नप निवडणुकी करिता महत्वाचीं ठरणार**

२०१९च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे महाराष्ट्रत पानिपत झाले आणि महाराष्ट्रत ऐकमेव खासदार दिवंगत बाळूभाऊ उर्फ सुरेश धानोरकर २०१९च्या काळात काँग्रेस चे एकमेक खासदार निवडून आले.२०१९मध्ये काँग्रेस पक्षाचे पानीपत झाले असताना तब्बल १५वर्षांनी चंद्रपूर लोकसभा क्षेत्रा काँग्रेसच्या कार्यकर्तेना खासदारच्या स्वरूपात बळ मिळाले परंतु काही वर्षांनंतरचं बाळूभाऊच्या अकास्मित निधनाने चंद्रपूर लोकसभेचं वाघ जरी गेला असला तरी बाळुभाउच्या स्वरूपात त्यांच्या पत्नी प्रतिभाताईने २०२४च्या निवडणुकीत भरघोस मतांनी विजयी होत काँग्रेस लोकसभेचा चंद्रपूर हा गड अबाधित राखून ठेवला नंतर काँग्रेसचा विस्तार आपल्या लोकसभा क्षेत्रात वाढवीला काँग्रेस पक्ष्याचे बळ देखील वाढविले.

परंतु चंद्रपूर लोकसभा क्षेत्रामध्ये येणाऱ्या केळापूर आर्णी विधानसभा निवडणुकीच्या जिल्हात काँग्रेसचे सर्वोच्च समजणारे माजी सामाजिक न्याय मंत्री यांच्या शब्दाला जगनारी प्रतिभाताईनी या काँग्रेसच्या माजी मंत्राच्या नेहमी शब्दाला मान पक्षाचे मोठे नेते म्हणून देत आल्या परंतु हिंदी भाषिक भायाचा अट्टहास ठेवणारे साहेब प्रतिभाताईच्या भूमिकेला विरोध करून भायाला सर्वोच्च म्हणून हिंदी भाषिकाला उमेदवारी देणार का? या संपूर्ण कृतीवर घाटंजीतील सुजाण मतदान दाते देखील करडी नजर ठेऊन आहेत.

# दिवाळीच्या सुट्ट्यात घरी आलेल्या शिक्षकाने केली आत्महत्या

## नींगनूर येथील बदुसिंग राठोड यांनी स्वतःच्या घरात घेतला गळफास

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजु गायकवाड**

मुंबई महापालिकेत शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या व दिवाळीच्या सुट्टीत मूळ गावी निंगनुर येथे आलेल्या शिक्षकाने आपल्या घरी तीन पत्र्याच्या लोखंडी ग्रीलला गळफास लाऊन आत्महत्या केल्याची घटना दि 1 नोव्हेंबर रोजी सकाळी 9:30 वाजताचे सुमारास घडली . बदुसिंग पोमा राठोड वय 35 वर्षे असे आत्महत्या केलेल्या शिक्षकाचे नाव आहे .

त्याचा चुलत भाऊ अविनाश मुरलीधर राठोड रा निंगनुर वय ४४ वर्षे यांनी बिटरगाव पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचा चुलत काका नामे पोमा भिकु राठोड वय ६५ वर्षे हे त्यांचे कुटुंबासह राहतात. त्यांना एक



मुलगा नामे बददुसिंग पोमा राठोड वय ३५वर्षे हा असुन तो मुंबई महानगर पालिकेत शिक्षक म्हणुन नोकरीला आहे. तो दिवाळीच्या सुटटीमध्ये त्याचे कुंटुंबासह गावी निंगनुर येथे आला होता.

दि.०१ नोव्हेंबर रोजी सकाळी ९:३० वाजताचे सुमारास घरी हजर असताना आमचे घरा शेजारी रोहीदास तारूसिंग चव्हाण वय २४वर्षे याने घरी येवुन सांगितले की, तुझा चुलत भाउ नामे बदुसिंग पोमा राठोड याने त्याचे घरी फाशी घेतली आहे असे सांगितले वरून मी प्रत्यक्ष त्याचे घरी जावुन पाहिले असता माझा चुलत भाउ नामे बददुसिंग पोमा राठोड याने त्याचे घराचे किचन रूम मध्ये ग्रील टिनपत्रा खालील लोखंडी अँगलला नायलॉन दोरीने गळफास लावुन मरण पावल्याचे दिसले. तेव्हा त्याची पत्नी शितल बदुसिंग राठोड वय ३० वर्षे व आई सौ सखुबाई पोमा राठोड वय ६० वर्षे यांना घटनेबाबात विचारले असता त्याचे पत्नीने सांगितले की सकाळी ८ :३० वाजता दरम्यान मला माझे पती बददुसिंग पोमा राठोड यांनी आपल्याला दुपारी परत मुंबईला निघायचे आहे, तुम्ही लवकर तयारी करा असे सांगितले होते. त्यानंतर मी व माझी सासु बाहेर अंगणामध्ये काम करत होतो, त्यानंतर मी ९ :३० वाजताच्या दरम्यान आमचे घराचे किचन रूम मध्ये गेले असता माझे पती बददुसिंग पोमा राठोड हे किचन रूम मधील टिनपत्रा खालील लोखंडी अँगल ला नायलॉन दोरीने गळफास लावुन लटकलेले दिसले त्यानंतर मी आरडा ओरडा केल्याने आजुबाजुचे नातेवाईक जमा झाले असे सांगितले. त्यानंतर मी गावातील आमचे समाजातील प्रतिष्टीत बिरजु मुडे व इतर लोकांना बोलावुन घेतले. बिरजु मुडे यानी सदर घटनेची माहिती पोलीसांनी दिली.बिटरगाव पोलिस स्टेशनचे घटनास्थळी उपनिरीक्षक सागर आन्नमवार व बिटजमादार रवि गिते.पो.कॉं हिम्मत जाधव यांनी पंचनामा केला परंतु आत्महत्येचे कारण कळू शकले नाही . पुढील तपास बिटरगाव पोलीस करीत आहे .

# महिलांची आर्थिक फसवणूक HBN-फूड्स कंपनी विरुद्ध तक्रार दाखल

## निर्भय महाराष्ट्र पार्टीचे संतोष सुरवडकर यांचे पोलिस ठाणेस निवेदन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी – कृष्णा गायकवाड**

**पिंपळगाव बसवंत (ता. निफाड)** — साकोरे मिग परिसरातील सुमारे ४० ते ५० महिलांची आर्थिक फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दिल्लीस्थित एच बी एन फुड्स लिमिटेड . या कंपनीने "पाच वर्षांत दुप्पट रक्कम परत देण्याचे" आमिष दाखवून महिलांकडून मोठ्या प्रमाणावर आर्थिक गुंतवणूक करून घेतली होती.

पीडित महिलांनी रु. ३०,००० ते ५०,००० इतकी रक्कम विविध योजनांअंतर्गत कंपनीच्या खात्यात जमा केली. मात्र, ठरावीक पाच वर्षांची मुदत संपल्यानंतरही त्यांना एकाही रुपयाची परतफेड न झाल्याने या महिलांची मोठी



फसवणूक झाल्याचे समोर आले आहे.

या संदर्भात आज सौ. संगीता भास्कर साताळे (रा. साकोरे मिग, ता. निफाड) यांनी अन्य पीडित महिलांसह निर्भय महाराष्ट्र पार्टीच्या निफाड तालुका अध्यक्षा अर्चनाताई गायकवाड व तालुकाध्यक्ष संतोष सुरवडकर यांच्या नेतृत्वाखाली पिंपळगाव बसवंत पोलीस ठाणे येथे लेखी तक्रार दाखल केली.

पोलिसांनी या तक्रारीची प्राथमिक चौकशी सुरू केली असून, गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.

महिलांच्या निवेदनानुसार, कंपनीचे स्थानिक प्रतिनिधी म्हणून खालील व्यक्तींनी रक्कम वसूल केली होती:

संजय गाढवे,चव्हाण सर,धुमाळ सर,संगीता सागरे,यादव सर,मथुर सर,आण्णा साळुंके,जगनाथ सर

या सर्वांनी मिळून कंपनीच्या नावाने लाखो रुपयांची वसुली केल्याचे नमूद करण्यात आले आहे.

पीडित महिलांनी पोलिस प्रशासनाकडे मागणी केली आहे की, एच बी एन फुड्स लिमिटेड . तसेच संबंधित एजंट यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करून गुंतवणूकदारांना न्याय मिळावा.

या प्रसंगी उपस्थित होते — संतोष सुरवडकर (निर्भय महाराष्ट्र पार्टी तालुकाध्यक्ष), संजय शिंदे, वैभव बोरस्ते, अर्चनाताई गायकवाड, फारुक शेख, शरद सोळसे, संतोष बोरसे आणि गोकुळ पगारे.

या प्रकरणात पिंपळगाव बसवंत पोलिसांनी सखोल तपास सुरू केल्याची माहिती स्थानिक अधिकाऱ्यांनी दिली आहे.

# सिल्लोड शहरातील महामार्गाच्या फुटपाथच्या जागेवरील अतिक्रमण देत आहे अपघाताला निमंत्रण

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** शहरातून जाणाऱ्या छत्रपती संभाजीनगर जळगाव राज्य महामार्गाच्या रस्त्यालगत असलेल्या फुटपाथ च्या जागावर मागील १५ दिवसात मोठ्या प्रमाणात होत असलेले अतिक्रमण अपघाताला निमंत्रण देत असून या कडे वेळीच लक्ष देण्याची मागणी माजी नगरसेवक सुधाकर सोनवणे यांनी केली आहे.

शहरातून जाणाऱ्या या मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूने काही जागा शिल्लक आहे. या जागेवर संबंधित यंत्रणेकडून नागरिकांना पायी चालण्यासाठी रस्ता बनविण्यात यावा अशी जनतेची मागणी आहे. परंतु या मोकळ्या जागेवर काही व्यावसायिकांनी स्वखर्चाने डबल माती आणून टाकली व आपली दुकाने थाटली आहेत यामुळे या दुकानात खरेदी करण्यासाठी येणारे ग्राहक आपली चार चाकी दुचाकी वाहने रस्त्यावरच उभी करून भीषण अपघातांना निमंत्रण देत आहेत. याशिवाय मागील आठ दिवसांपूर्वी भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयालगत असलेल्या मोकळ्या जागेवर टाकण्यात आलेल्या दुकानांमुळे दोन कारची एकमेकांना जबरदस्त धडक झाली. यात सूदैवाने जीवित हानी झाली नाही परंतु या अपघातानंतरही संबंधित पोलीस यंत्रणेने याची दखल न घेतल्याने या रस्त्यालगत मागील आठ दिवसात आणखी नव्याने दुकाने थाटण्यात आली. यामुळे या रस्त्याने नागरिकांना पायी चालण्यासाठी जागाच शिल्लक राहिलेली नाही. परिणामी नागरिकांना जीव मुठीत घेऊन या रस्त्याने चालावे लागत आहे. याबाबत संबंधित यंत्रणे तात्काळ लक्ष द्यावे नसता या रस्त्यावरून कधीही अपघात होऊन निरपराध व्यक्तींना जीव गमवावा लागण्याची भीती निर्माण झाली आहे.

# सोयाबीनला तब्बल ४५०० भाव देत शेतकऱ्यात आनंदाचे वातावरण

## शेतकऱ्यांकडून रजनीकांत बोरेले यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

**पांढरकवडा -** कृषी उत्पन्न बाजार समितीतील अपक्ष संचालक तसेच प्रसिद्ध धान्य खरीददार व अडतदार रजनीकांत डालूरामजी बोरेले (आर.बी.) यांनी यंदाच्या सोयाबीन खरेदी हंगामाचा शुभारंभ गोपाल अष्टमीच्या मुहूर्तावर,दिनांक ३० ऑक्टोबर रोजी विधिवत पूजा-अर्चना करून केला.ढोल-ताशांच्या गजरात,वैदिक मंत्रोच्चार आणि नारळ फोडून सोयाबीन खरेदीचा शुभारंभ करत बोरेले यांनी प्रती क्विंटल ४५०० असा दर जाहीर केला. हा दर पांढरकवड्यासह संपूर्ण विदर्भातील इतर मंड्यां पेक्षा जास्त असल्याने हा निर्णय शेतकऱ्यांमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे. पांढरकवडा बाजार समितीचा अधिकृत शुभारंभ २७ ऑक्टोबर रोजी झाला होता.त्या दिवशी सोयाबीनचे भाव ४०६० पासून खाली ८०० पर्यंत घसरले होते.मात्र,बोरेले यांच्या खरेदीच्या मुहूर्तावर दर ४५०० ते २०००(मातीरा) पर्यंत राहिल्याने शेतकऱ्यांना समाधानकारक भाव मिळाला.या पार्श्वभूमीवर रजनीकांत बोरेले यांच्या कार्याचे आणि शेतकऱ्यांप्रती असलेल्या बांधिलकीचे कौतुक म्हणून उपस्थित विविध



गावातील ळ सर्व शेतकऱ्यांनी त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार केला.यावेळी बोरेले यांना फूलांचा हार घालून शाळ व नारळ देवून सत्कार करण्यात आले आहे यावेळी राजुकाका बोरेले,शिवम बोरेले वासुदेव राठोड,बंटी बोरेले,तारकेश्वर चव्हाण ,धरम सिंग राठोड,उमेश पंचोली,स्मित झाजरीय,सर्वम रजनीकांत बोरेले,प्रमुख्याने उपस्थित होते,रजनीकांत बोरेले यांच्या व्यवहारातील प्रामाणिकपणा आणि शेतकरी हिताचा दृष्टिकोन यामुळे त्यांच्यावर शेतकऱ्यांचा प्रचंड विश्वास आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी बाजार समितीचा प्रारंभ झाल्या दिवशीच म्हणजे २७ ऑक्टोबरला आपले सोयाबीन आवारात ठेवून बोरेले यांच्या मुहूर्ताची प्रतीक्षा केली.३० ऑक्टोबर रोजी त्यांच्या खरेदी दरम्यान बाजार समिती परिसरात शेतकऱ्यांची प्रचंड गर्दी उसळली होती. या वेळी व्यापारी नितीन बाजोरिया, प्रमोद भूत, आनंद चोपडा, सुहास कापर्तिवार, महेश आदेवार,गजानन ओसावार,गणेश हटकर, गुंटटू धादोड़ आदी मान्यवर व्यापारी तसेच बाजार समितीचे सचिव सुरेश खानदनकर उपस्थित होते.बोरेले खरेदीदारांकडे चांगला भाव,प्रामाणिक व्यवहार आणि सन्मान मिळतो अशी चर्चा शेतकऱ्यांमध्ये सुरू आहे. एका अपक्ष संचालकाचा सर्व शेतकऱ्यांकडून अशा प्रकारे सत्कार होणे ही पांढरकवडा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या इतिहासातील दुर्मिळ घटना ठरली आहे.या प्रसंगी बोलतांना काही शेतकऱ्यांनी सांगितले की आम्ही इतर मंड्यांत कमी भावामुळे निराश झालो होतो. पण बोरेले यांनी मुहूर्तावर दिलेला ४५०० चा दर हा आम्हा शेतकऱ्यांसाठी दीपावली सारखा आनंदाचा क्षण ठरला असून आम्हाला विश्वास आहे बोरेले चांगला भाव देतात.रजनीकांत बोरेले मुळे आम्ही पांढरकवडा बाजार समिति ला येतात.बोरेले इथे येण्यापूर्वी आम्ही हिंगनघाट,यवतमाळ,घाटंजी किवा वणी अशा मंड्या मध्ये धान्य विकायचे असे मत शेतकऱ्यांणी व्यक्त केले,रजनीकांत बोरेले यांच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य आणि बाजार समितीत नवसंजीवनीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र अंनिसचे अभिवादन




**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड -** कारणाशिवाय कोणतीही गोष्ट घडत नाही, प्रत्येक घटनेमागे विज्ञान व काही ना काही हातचलाखी असते, असे सांगणारे डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने शनिवारी (दि.१) रोजी अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी डॉ. दाभोळकर यांच्या कार्यास उजाळा देणाऱ्या अनेक आठवणी सांगण्यात आल्या. अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकांचे अंक वाढविण्यासंबंधी आणि विवेकाचा आवाज बुलंद करण्यासंबंधी चर्चा करण्यात आली.

प्रारंभी डॉ. दाभोळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

चळवळीचे गीत गायन झाले. काही वैज्ञानिक प्रयोगाचे सादरीकरण आणि त्या पाठीमागील विज्ञान समजावून सांगण्यात आले. कार्यक्रमास जिल्हा प्रधान सचिव प्रा. शिवाजी वाठोरे, शाखा कार्याध्यक्ष डॉ. प्रकाश बिऱ्हाडे, प्रधान सचिव नारायणराव फाळके, उपाध्यक्ष जगदीश बेदवे, अशोक जाधव, वैज्ञानिक जाणिवा विभागाचे प्रा. डॉ. जे. एच. सावदेकर, सचिन साबळे, अनिल साबळे, प्रकाश सांडू पवार, अॅड. संतोष झाल्टे, नितीन निकम आदींसह सदस्य उपस्थित होते.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## जिल्हा स्थरीय मैदानी स्पर्धेत श्री शिवाजी विद्यालयाचे सुयश आणि विभागीय स्पर्धेसाठी निवड

**दैनिक युवक आधार**
**वरूड सर्कल प्रतिनिधी ज्ञानेश्वर निकाळजे**



दिनांक ०१/११/२०२५ रोजी जालना जिल्हा स्तरीय झालेल्या मैदानी स्पर्धेत जाफ्राबाद तालुक्यातील मौजे भारज बुद्रुक येथील श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय भारज बुद्रुक येथील विद्यार्थी सहभागी झाले होते.

त्यामध्ये कुं, प्रांजल हनुमान तारु हिने ३००० मीटर धावणे मध्ये द्वितीय क्रमांक मिळवला आहे तसेच १५०० मीटर धावणे मध्ये सुद्धा द्वितीय क्रमांक मिळवला आहे आणि कु ,कोमल गजानन फोलाने हिने ८०० मीटर धावणे मध्ये द्वितीय क्रमांक मिळवला आहे कु ,आरती युवराज मुरडकर हिने ६०० मीटर धावणे मध्ये द्वितीय क्रमांक मिळवला सचिन मधुकर देशमुख थाळीफेक मध्ये द्वितीय क्रमांक मिळवला आहे गणेश विश्वनाथ तारु क्रॉस कंट्री मध्ये सहावा क्रमांक आणि कु प्रांजल हनुमान तारु हिने क्रॉस कंट्री मध्ये पाचवा क्रमांक मिळवला आहे. तसेच ह्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे क्रीडा शिक्षक ए , ए मरकड सर,एस,एल मरकड सर, श्रीमती घोडके मॅडम यांच्या मुख्यध्यापक सर्व शिक्षक भारज बुद्रुक, भारज खुर्द चे सरपंच,पालक संस्थेचे अध्यक्ष सचिव व सर्व संचालक मंडळ यांनी स्वागत केले आणि पुढील विभागीय स्पर्धेत यश मिळण्यासाठी शुभेच्छा दिल्या..

## कामोठे पोलिसांच्या तपासावर आम्हाला पूर्ण विश्वास, आरोपी चा शोध हे लावतीलच - दिघे कुटुंबिय

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**

कामोठे पोलिसांच्या तपासावर आम्हाला पूर्व विश्वास असून ते दागिने चोरणाऱ्या आरोपींचा शोध लावलीत असे प्रतिपादन कामोठे वसाहतीमध्ये राहणाऱ्या दिघे कुटुंबीयांनी पत्रकार परिषदेमध्ये केले.

कामोठे वसाहती मधील गिरीजा सोसायटी प्रतीक जेम्स मध्ये राहणाऱ्या सविता म्हस्कर यांच्या घरातील ४० दिवसांपूर्वी लाखो रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीस गेले होते. या चोरी संदर्भात त्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषद मध्ये त्यांच्या घरा समोर राहणाऱ्या दिघे कुटुंबियांवर संशय व्यक्त केला आहे. या संदर्भात दिघे कुटुंबीयांनी आपली बाजू मांडताना आज पत्रकार परिषद



घेत म्हस्कर कुटुंबीयांनी केलेले आरोप हे बिनबुडाचे असून त्या कुटुंबियांसोबत आमचे गेल्या अनेक वर्षांपासून कौटुंबीक संबंध होते या संबंधामुळे त्यांनी त्यांच्या घराच्या चाव्या आमच्याकडे अत्यावश्यक वेळेसाठी ठेवत होते.

त्यामुळे सुद्धा त्यांचे म्हणणे आहे की चोरी आम्ही केली असावी. मात्र चोरी झाल्यापासून आम्ही त्यांच्या बरोबरच होतो. त्यांनी या पूर्वी त्यांच्या कडील सोन्याचे दागिने आम्हाला दाखवले होते. परंतु या चोरी संदर्भात आमचा कोणताही संबंध नाही आहे. पोलीस ठाण्यास तक्रार करण्यास आम्ही त्यांच्या बरोबरच होतो. गेल्या महिना भरापासून पोलिसांच्या चौकशीला आम्ही सामोरे जात आहोत. आमचे सीसीटीव्ही फुटेज, बँक खाते व आवश्यक असणाऱ्या सर्व माहिती आम्ही वेळोवेळी पोलिसांना दिल्या आहेत असे शंतनू दिघे व मोनिका दिघे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

जाणीव पूर्वक आम्हाला या चोरीच्या प्रकरणात गोवण्याचा या सोसायटीमधील काही जणांचा डाव आहे. नुकतेच सोसायटीची निवडणूक पार पडून त्यात मी अध्यक्ष म्हणून माझी निवड झाली तसेच आमचे पॅनल सत्तेत आले. याचा काही जणांना राग असून त्या संदर्भात त्यांनी आम्हाला धमक्या सुद्धा दिली आहेत अशी माहिती मोनिका दिघे यांनी यावेळी दिली. म्हस्कर कुटुंबियांना पुढे करून आमच्यावर चोरीचा आळ सोशल मीडियाद्वारे घातला जात आहे.

तसेच आमच्या दोघांच्या नोकरीच्या ठिकाणीसुद्धा आमची बदनामी केली जात आहे. परंतु या सर्व प्रकारामध्ये आमचा कुठल्याही प्रकारचा सहभाग नसल्याने कामोठे पोलीस लवकरच मुख्य आरोपींना गजाआड करतील असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे. या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लागल्यानंत आम्ही आमच्या मानहानी प्रकरणी गुन्हा दाखल करणार आलस्याचे सुद्धा दिघे कुटुंबीयांनी सांगितले.

## तहसीलदारावर लाचखोरीची गंभीर आरोप, ७० वर्षीय शेतकरी महिलेचे अन्यायाविरोधात उपोषण!

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**वाशिम**-तालुक्यातील उकळी पेन येथील ७० वर्षीय शेतकरी महिला रुखमाबाई वामन जमधाडे यांनी तहसीलदार निलेश पळसकर यांच्या विरोधात दोन लाख रुपयाची लाच घेतल्याचा गंभीर आरोप करत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १४ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर २०२५या कालावधीत उपोषण केले.

मात्र उपोषण चमकेपर्यंत जिल्हाधिकारी वाशिम यांनी कोणतीही कारवाई न केल्याने रुक्माई यांनी आता मंत्रालय नोंदणी येथील आझाद मैदानात ५ डिसेंबर रोजी उपोषणास बसण्याची चेतावणी दिली आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, संबंधित प्रकरण क. रा. मा.क.आर.टी.एस.५९/उकळी पेन/०१/२०२३-२०२४ हे असून, तहसीलदार निलेश पळसकर यांनी अर्जदारांकडून लाच



घेऊन निर्णय त्यांच्या बाजूने देत १९८६ पासून असलेल्या जमधाडे यांच्या खरेदी खताची नोंद बेकायदेशीरपणे रद्द केल्याचा आरोप आहे. तसे तलाठी व मंडळ निरीक्षक यांनीही या प्रकरणात मोजे उकळी पेन, गट क्रमांक.२९४ मधील ०.७४ गुंठे शेती जमिनीची नोंद परस्पर रित्या बदलून दिल्याचे जमदाडे यांनी म्हटले आहे. उपोषणात रम्यान वाशिम मध्ये झालेल्या पावसामुळे रुकमाबाई यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले, तरी प्रशासनाने

> ‘मी ७० वर्षाची असून न्यायासाठी लढते आहे. प्रशासनाने वेळेत कारवाई केली नाही तर मला पुन्हा उपोषणावर बसावे लागेल.’
> - रुखमाबाई जमधाडे

कोणीतरी ठोस कारवाई केली नाही. त्यामुळे त्यांनी ही उपोषण तात्पुरते स्थगित करून आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तेही निवेदन दिले आहे. त्या निवेदनात त्यांनी तहसीलदार निलेश पळसकर यांना विलंबित करून त्याची बदली गडचिरोली जिल्ह्यात करण्याची मागणी केली आहे. तसेच १ डिसेंबर पर्यंत कारवाई न झाल्यास त्या ५ डिसेंबर रोजी मंत्रालयात उपोषणास बसणार असण्याची स्पष्ट केले आहे. या निवेदनाची प्रत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि विभागीय आयुक्त अमरावती यांनाही पाठविण्यात आली आहे. या प्रकरणात प्रशासन कोणती पावले उचलते, याकडे आता जिल्ह्यातील नागरिकांची लक्ष लागले आहे.

## श्रीवर्धनमध्ये विकासाची नवी पहाट!;मा.ना.कु. आदितीताई तटकरे यांच्या हस्ते कोट्यवधींच्या विकासकामांचे भूमिपूजन भव्य उपस्थितीत संपन्न

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**

श्रीवर्धन शहर आणि परिसरातील नागरिकांच्या दीर्घ प्रतीक्षेला पूर्णविराम देत आज रविवार, दि. २ नोव्हेंबर २०२५ रोजी, कोकणच्या विकासदृष्टीने महत्त्वाचे ठरणारे अनेक पायाभूत आणि पर्यटनवर्धक प्रकल्पांचे भूमिपूजन उत्साहात पार पडले.

या सर्व विकासकामांचा शुभारंभ मा.ना.कु. आदितीताई सुनील तटकरे (मंत्री, महिला व बालविकास, महाराष्ट्र राज्य) यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. श्रीवर्धनच्या प्रगतीचा नवा अध्याय आजपासून सुरू झाल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

**प्रमुख प्रकल्पांचे तपशील:**



श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर दांडा विभागात धूपप्रतिबंधक बंधारा बांधणी आणि किनाऱ्याचे सुशोभीकरण — ₹५,३९,६८,५८५/- इतक्या कोट्यवधींचा प्रकल्प, ज्यामुळे किनाऱ्याचे रक्षण आणि पर्यटन विकासाला चालना मिळणार आहे. श्री नारायण पाखाडी उत्तर विभाग रस्त्याचे डांबरीकरण — पर्यटकांना किनारी भागात पोहोचण्यासाठी सुलभ मार्ग.

श्री. दिनेश पेरेकर यांच्या घरापासून ते दामू पाटील यांच्या घरापर्यंत मुख्य रस्ता ओलांडून गटार बांधकाम — स्वच्छता आणि पावसाळी पाण्याचा निचरा सुधारण्यासाठी महत्त्वाचे पाऊल.

जीवनेश्वर मंदिर ते जीवना बंदर रस्ता डांबरीकरण — धार्मिक आणि मत्स्य व्यवसायिक वाहतुकीला नवे बळ. धोंडगल्ली, श्रीवर्धन येथे आधुनिक व्यायामशाळेचे बांधकाम — युवकांच्या आरोग्य आणि फिटनेससाठी महत्त्वाची सुविधा.

या प्रकल्पांमुळे श्रीवर्धन शहराच्या विकासाला नवी गती मिळणार असून पर्यटन, पायाभूत सुविधा आणि जनसुविधा या सर्व क्षेत्रांमध्ये गुणात्मक बदल होईल, असा विश्वास मा. आदितीताई तटकरे यांनी व्यक्त केला.कार्यक्रमास नगरपरिषद पदाधिकारी, स्थानिक मान्यवर, अधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.श्रीवर्धनकरांनी या सर्व कामांचा प्रारंभ ‘श्रीवर्धनच्या सर्वांगीण विकासाची सुरुवात’ असा आशावाद व्यक्त करत उत्साहाने स्वागत केले.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांचा संताप – भरपाईसाठी शासन दरबारी फिरूनही मदत नाही

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी महेश साळुंके/लासलगाव**

निफाड तालुक्यात मे-जून महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पंचक्रोशीत शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. रुई, खेडलेझुंगे, कोळगाव, देवगाव, सारोळे थडी, नांदूर मध्यमेश्वर, गाजरवाडी, धारणगाव वीर, धारणगाव खडक, करंजी, ब्राह्मणवाडे, झुंगे बेट, तमासवाडी या गावांतील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या संदर्भात शेतकऱ्यांनी माजी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि जिल्हाधिकारी नाशिक यांना लेखी निवेदन देऊन नुकसानभरपाईची मागणी केली होती. शासनाने निर्देश देत पंचनामे पूर्ण केले असले तरीही, अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यावर भरपाई जमा झालेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

या पार्श्वभूमीवर आज दिनांक १ नोव्हेंबर रोजी, कृषी उत्पन्न बाजार समिती, लासलगाव यांच्या विंचूर उपबाजार समिती येथे शेतकऱ्यांनी पोलीस उपनिरीक्षक मोहन पाटील यांच्या माध्यमातून तहसीलदार निफाड यांना निवेदन सादर केले.

या निवेदनात शेतकऱ्यांनी नमूद केले आहे की,



“मे-जून महिन्यातील अतिवृष्टीदरम्यान आमच्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले. पंचनामे पूर्ण होऊनही शासनाकडून एक पैसाही मिळालेला नाही. त्यामुळे आम्ही बाधित शेतकरी आर्थिक संकटात आहोत. शेतकऱ्यांनी तात्काळ नुकसानभरपाई वितरित करण्याची मागणी केली असून, भरपाई न मिळाल्यास कठोर आंदोलनाचा इशारा दिला आहे.”

या निवेदनावर शिवाजी सुराशे, निवृत्ती गारे, गोपीनाथ ठुबे, विजय गिते, धर्मराज घोटेकर, केदार घोटेकर, योगेश घोटेकर, सचिन क्षीरसागर यांसह अनेक शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

शेतकऱ्यांची मागणी ठाम “शासनाने तात्काळ नुकसानभरपाई वितरित करून न्याय द्यावा; अन्यथा तीव्र आंदोलन उभारले जाईल.”

## माध्यमिक शिक्षकेतर संघटनेची वाशीम तालुका कार्यकारिणी गठीत

### तालुका अध्यक्षपदी संजय ठाकरे तर सचिवपदी निलेश तिवारी

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**वाशीम :-** माध्यमिक शिक्षकेतर संघटनेची वाशीम तालुका कार्यकारिणी गठीत करण्यात आली. शिक्षकेतर संघाचे जिल्हाध्यक्ष कैलास ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली मालतीबाई सरनाईक विद्यालय वाशीम येथे शनिवारी सभा पार पडली. या सभेत तालुका कार्यकारिणी गठीत करण्यात आली. या सभेत वाशीम तालुका अध्यक्षपदी संजय ठाकरे, सचिवपदी निलेश तिवारी यांची निवड करण्यात आली.

उर्वरित कार्यकारिणी मध्ये कार्याध्यक्षपदी अभिजीत पसारकर, उपाध्यक्षपदी धीरज लवंडे, देवानंद काटेकर, विजय मुसळे, करुणाताई बंडेवार, सहसचिव पदी विठ्ठल सोमटकर, कोषाध्यक्षपदी मनीष मखमले, तालुका संघटकपदी महादेव मुसळे, प्रथमेश पाटील, परमेश्वर राठोड, सुभाष करवते तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून रामप्रसाद खंडारे यांची निवड करण्यात आली. निवडणूक प्रमुख म्हणून जिल्हा शिक्षकेतर



संघाचे सचिव रामराव कायंदे यांनी काम पाहिले. यावेळी जिल्हा शिक्षकेतर संघाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल काळे,उपाध्यक्ष आनंद पेंटे, जयंत सरनाईक,महादेव धुळधुळे, कोषाध्यक्ष अमोल मोहोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी जिल्हा सचिव रामराव कायंदे यांनी शिक्षकेतर संघटनेची गरज या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. जिल्हाध्यक्ष कैलास ढवळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून संघटन आवश्यक आहे. संघटने शिवाय प्रश्न सुटणार नसून शिक्षक आमदारांनीसुद्धा संघटनेची दखल घेतल्याचे आवर्जून सांगितले. सभेचे संचालन मनीष मखमले यांनी केले.

## तीन जिल्ह्यातील नुकसानग्रस्तांना मदतीसाठी ८५ कोटींचा निधी!; वाशिमच्या वाट्याला सर्वाधिक ३६ कोटी

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**वाशिम:** राज्यातील यवतमाळ, सोलापूर आणि वाशिम या तीन जिल्ह्यांमध्ये सप्टेंबर २०२५ या महिन्यात अतिवृष्टीमुळे पिकांची प्रचंड हानी झाली. दरम्यान, ३० ऑक्टोंबर ला पारित शासन निर्णयान्वये या तीन जिल्ह्यांना ८५कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला असून, वाशिम च्या वाट्याला सर्वाधिक ३६ कोटी ४० लाख ४४ हजार रुपये आले आहेत.

वाशिम सह राज्यातील अनेक जिल्ह्यांना यंदाच्या पावसाळयात अतिवृष्टी, मुसळधार पाऊस आणि पूर परिस्थितीने अक्षरशा: झोडपून काढले. या नैसर्गिक संकटाच्या तडाख्यात सापडून लाखो हेक्टर वरील पिकांची अतोनात हानी झाली. दरम्यान, सप्टेंबर महिन्यात वाशिमसह यवतमाळ आणि सोलापूर जिल्ह्यांमध्ये झालेल्या पीक नुकसान भरपाई पोटी २ हेक्टर पर्यंतच्या मर्यादित शासनाने ८५ कोटी २४ लाख १३हजार रुपयांचा मदत निधी वितरित करण्यास ३०ऑक्टोंबर रोजी मंजुरी दिली आहे.

यंदाच्या पावसाळयात अतिवृष्टी मुळे झालेल्या पीक नुकसानाच्या भरपाई पोटी शासनास्तरावरून टप्याटप्प्याने मदत निधी वितरित केला जात आहे.३० ऑक्टोंबर रोजी शून्य ते दोन हेक्टर पर्यंतच्या मर्यादेत वाशिम जिल्ह्यातील नुकसानग्रस्त ३८,७३४ शेतकऱ्यांसाठी ३६ कोटी ४० लाख ४४ हजार रुपयांचा मदत निधी मंजूर झाला आहे.

## मराठी गझलेचा बिलोरी आरसाः गझलेचे उपयोजित छंदःशास्त्र !!


**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर**

एखाद्या विधेवर सविस्तर प्रकाश टाकण्यापेक्षा त्या विधेचा सूक्ष्म अभ्यास करून त्याची तर्कशुद्ध मांडणी करणे, हे फार मोठे आव्हान असते. मात्र, वाचक आणि अभ्यासकांसाठी त्या विधेची शास्त्रशुद्ध माहिती खूप आवश्यक असते. थोडक्यात, गोंगाट आणि आतला आवाज यातला फरक समजला की झाले. हसत ,खेळत सहज बोलता आले पाहिजे, सांगता आहे पाहिजे. प्रसंगी बोजड भाषाशैली न वापरता सहज ओघवत्या भाषेत सांगितले की समजायला ते कठीण जात नाही. माहीत नसलेली एखादी गोष्ट माहीत झाली की तिचे नाविन्य संपुष्टात येत असते.श्रीकृष्ण राऊत यांच्या 'गझलेचे उपयोजित छंदःशास्त्र' या ग्रंथाचे मात्र तसे नाही. यातील प्रत्येकच प्रकरण पुनःपुन्हा वाचून काढावे असे वाटते. जितक्या वेळा तुम्ही वाचाल तितके नवीन काही प्राप्त होते. उदा. काफिया आणि त्याचे प्रकार, शुद्धाशुद्धता/ अस्पष्ट आणि स्पष्ट दोष याबद्दलची विस्तृत; पण नेमकी माहिती, मराठी गझलेच्या अनुषंगाने आलेले बारीकसारीक तपशील, 'गझलेचे उपयोजित छंदःशास्त्र' या ग्रंथात देण्यात आले आहेत.

मराठी गझल, कुठून आली - कशी आली. नेमके बाळसे धरून स्थिरावली कशी. सध्याची तिची परिस्थिती काय आहे. दिवसेंदिवस रुजत जाणारे तिचे अंतरंग आणि तिला दिवसेंदिवस मिळत असलेला प्रचंड प्रतिसाद. तिने जपलेले सामाजिक भान या संबंधांत विस्तृत चर्चा या पुस्तकातुन करण्यात आली आली आहे. गझलेची वृत्ते, वृतांचे वर्गीकरण, त्यांच्यातील लवचिकता, गझलेच्या वृत्तांमधील यतिस्थान,काफिया, रदीफ, शेर, गझलेची भाषा आणि एकूण ५ परिशिष्टे असा भला मोठा अवाका, 'गझलेचे उपयोजित छंदःशास्त्र' या ग्रंथाचा आहे.

एखादी कलाकृती परिपूर्ण असावी, असा अट्टाहास धरताना त्यामागची धडपड, घेतलेले परिश्रम आणि अथांग व्यासंग हा ग्रंथ वाचताना ध्यानात येतो. पुस्तकातील साऱ्याच गोष्टी माहीत आहेत असे तयारीच्या वाचकांस वाटणे स्वाभाविक आहे. नेमके काय पाहिजे अन् काय असायला पाहिजे याचा सूक्ष्म अभ्यास लेखकाने इथे केल्याचे आवर्जून सांगावेसे वाटते. प्रसंगी पट्टीच्या गझलकारालाही हा ग्रंथ वाचल्यानंतर खूप काही प्राप्त झाल्याचा साक्षात्कार झाल्याखेरीज राहणार नाही. साऱ्याच गोष्टी माणूस प्रामाणिकपणे कबूल करत नाही ही बाब अलाहिदा! परंतू, या पुस्तकांतून आपण अमूक एक शिकलो, ह्या दृष्टीने नवोदितांसाठी ह्या ग्रंथातील हरेक ओळ अन् त्यातील प्रत्येक शब्द खूप महत्वाचे. प्रस्थापितांसाठी, प्रत्येक पानांतून एखादी गोष्ट तरी कामाची आहेच हे मनोमन वाटले तर फार आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. नवोदितासाठी घबाड अन् प्रस्थापितांना लावलेला कासरा या ग्रंथातून सहज दिसून येतो. एखाद्या विधेच्या नादी लागून तिच्याशी समरस होणे व अख्खी हयात तिचे बारकावे समजून घेण्यासाठीची तपश्चर्या म्हणजे, श्रीकृष्ण राऊत यांचा 'गझलेचे उपयोजित छंदःशास्त्र' हा ग्रंथ होय.

'गझलेचे उपयोजित छंदःशास्त्र' या ग्रंथात ५ व्या परिशिष्टात 'वारंवार विचारले जाणारे प्रश्न' या अनुषंगाने सुंदर असे मार्गदर्शन करण्यात आले आहे. गझलेला शीर्षक असावे का? प्रत्येक गझलेमध्ये मक्ता असतो का? मतलाबंद गझल म्हणजे काय? हझल म्हणजे काय? सर्वसामान्य व्यक्तीला व नवोदिताला भेडसावणारे हे प्रश्न व त्याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. जगरहाटीत, काही गोष्टी खूप साध्या सोप्या वाटत असतात; पण त्याच खूप कठीण असतात. गझल तर लिहून झाली हिला शीर्षक देऊ की नको? अन् द्यायचेच तर काय द्यायचे, असा संभ्रम पडण्याचे आता काही एक कारण नाही. आपण लिहिलेल्या गझलमध्ये 'मक्ता' असणे आवश्यक आहे का? वा तो टाळता येऊ शकतो का ? गझल मतलाबंद कशी असते. गझलसंग्रह आणि 'दीवान' यातील नेमका फरक छान समजावून सांगितला आहे. विशेषतः 'इस्लाह' चे बाबतीत मौलिक माहिती देताना श्रीकृष्ण राऊत यांनी वैयक्तिक अनुभव विशद केला आहे आणि तो खूप महत्वाचा आहे असे माझे प्रामाणिक मत आहे.




प्रस्थापित गझलकारांचा, नवोदितांच्या बाबतीतला दृष्टिकोन कसा असावा हे इथे अपेक्षित आहे असे मला वाटते.

'गझलेचे उपयोजित छंदःशास्त्र' या ग्रंथावर वाचकांच्या अन् विशेषतः अभ्यासकांच्या उड्या पडणे स्वाभाविक होते. विविध माध्यमातून आजवर श्रीकृष्ण राऊत सरांना, वाचत आलेल्या वाचकांना, 'बाराखडी' नंतर परिपूर्ण अशी एखादी कलाकृती हवी होती. मराठी गझलेचे विद्यापीठ असणाऱ्या अधिकारी व्यक्तीने एखादा परिपूर्ण ग्रंथ निर्माण करावा असे माझ्यासारख्या अनेकांना खूप दिवसांपासून वाटत होते. शेवटी ईश्वरापर्यंत ती आर्जवं पोचली. एका सुंदर परिपूर्ण ग्रंथाची निर्मिती विधात्याने करून घेतली. मराठी गझलेच्या इतिहासात, 'गझलेचे उपयोजित छंदःशास्त्र' या ग्रंथाची नोंद सुवर्ण अक्षरांनी घेतली जाईल असा भरवसा आहे. यानंतरच्या गझल लेखनासाठी वाहून घेतलेल्या पिढ्यांसाठी हा ग्रंथ मार्गदर्शनपर मैलाचा दगड ठरेल यात शंका नाही. अनेक ताकदीचे गझलकार निर्माण करण्याची क्षमता या ग्रंथात निश्चितच आहे. तव्दतच, प्रस्थापित गझलकारांनासुद्धा नवचैतन्याचे धुमारे फुटतील. समस्त रसिक चाहते, कविता - गझलप्रेमी श्रीकृष्ण राऊत सरांचे कायम ऋणी राहतील.

या ग्रंथासंबधी लिहावे तितके कमीच आहे. अक्षरशः लिहिणाऱ्याला कसावर लावणारा हा ग्रंथ आहे. काय लिहू अन् काय नको असे अगदी होऊन जाते. लहान मूल यात्रेत नेले की 'हे घेऊ का ते घेऊ' असे म्हणून हरखून जाते. तसेच ह्या ग्रंथाच्या बाबतीत होते. प्रत्येक पानावरील माहिती इतकी काटेकोर आहे की, गझल क्षेत्रातील एखादा पांगळा दुडूदुडू चालायला लागून कालांतराने धावायला लागला तर फार आश्चर्य वाटू नये. ग्रंथ संग्रही असणे व त्याची जमतील तशी पारायणे करणे गरजेचे आहे. काय अन् किती वाचले पेक्षा किती समजले, समज- गैरसमजाला फुली मारुन झाले की नाही, हे महत्वाचे! ज्या ग्रंथाची आपण आतुरतेने वाट पाहत होतो तो आपल्या पुढ्यात अभ्यासायला मिळणे हे वेगळे समाधान निश्चितच आहे. या सर्वांगसुंदर- अभ्यासपूर्ण ग्रंथाची प्रस्तावना, डॉ. अविनाश सांगोलकरांनी लिहिली आहे. ते म्हणतात, 'असा हा ग्रंथ मराठी गझलविश्वासाठी निश्चितच उपकारक आणि दिशादर्शक ठरेल. ' आकर्षक असे मुखपृष्ठ, सतीश पिंपळे यांनी रेखाटले आहे.

गझलेचे उपयोजित छंदःशास्त्र
लेखक -- श्रीकृष्ण राऊत
प्रकाशक - स्वयं प्रकाशन
पृष्ठे - २७६
मूल्य- ४००/- रू.

---

**सुरेश नागले. नेरूळ पू. नवी-मुंबई**

## जरंडी ग्रामपंचायतीकडून पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षणासाठी गोळाफेक साहित्य वाटप



**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-** तालुकातील जरंडी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामपंचायतीतर्फे गावातील इच्छुक तरुणांना पोलीस भरतीच्या पूर्वतयारीसाठी आवश्यक गोळाफेक साहित्य वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे तरुणांच्या क्रीडा व शारीरिक तयारीला चालना मिळणार असून, ग्रामपंचायतीने विकासाची नवी दिशा दाखवली आहे.या प्रसंगी ग्रामपंचायत अधिकारी एस.एम.मंगरूळ,सरपंच स्वाती दिलीप पाटील तसेच उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ उपस्थित होते.गावातील तरुणांना योग्य मार्गदर्शन व साधनसामग्री उपलब्ध करून देत त्यांना शासकीय सेवेत प्रवेशासाठी प्रोत्साहन देण्याचा ग्रामपंचायतीचा हेतू असल्याचे सरपंच स्वाती दिलीप पाटील यांनी सांगितले.या उपक्रमामुळे जरंडी गावाने युवक सक्षमीकरण आणि सर्वांगीण विकासाचा नवा आदर्श निर्माण केला आहे.

# दैनिक युवक आधार - इनफॅक्ट

## "दैनिक युवक आधार"ने बातमी प्रसारित करताच प्रशासन जागं !

### ग्रामपंचायत सदस्य राजू मोरे यांच्या पुढाकाराने विंचूर बसस्टँड परिसर पाण्याने धुऊन स्वच्छ — नवीन लाईट लावण्यात आले

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर (ता. निफाड) :** "दैनिक युवक आधार"ने विंचूर बसस्टँड परिसरातील अंधार, अस्वच्छता आणि प्रवाशांना होणाऱ्या त्रासाविषयी ठळकपणे बातमी प्रसिद्ध केल्यानंतर प्रशासन झपाट्याने सक्रिय झालं. ग्रामपंचायत सदस्य राजू मोरे यांच्या पुढाकाराने बसस्टँड परिसरात स्वच्छता मोहिम राबवून परिसर पाण्याने धुऊन स्वच्छ करण्यात आला, तसेच प्रवाशांच्या सोयीसाठी नवीन एलईडी लाईट बसवण्यात आली.





युवक आधार
संपादक : श्री. संतोष शिवदास आमले
बसस्थानक की कचरा डेपो?
लांब पल्ल्याच्या बस 'ओव्हरटेक', प्रवाशांची गैरसोय चरमसीमेवर!
दैनिक युवक आधार
निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे
विंचूर :-निफाड तालुक्यातील विंचूर येथील एस.टी. बसस्थानकाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. अस्वच्छता, पिण्याच्या पाण्याची कमतरता आणि तुटलेल्या सुविधांमुळे प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच लांब पल्ल्याच्या बस विंचूर स्थानकात थांबत नसल्याने प्रवाशांचा संताप उसळला आहे.
लांब पल्ल्याच्या बस 'ओव्हरटेक'
विंचूर हे नाशिक- छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील प्रमुख केंद्र असूनही, पुणे, मुंबई, शिर्डी, छत्रपती संभाजीनगर आदी ठिकाणांच्या बस गाड्या येथे थांबत नाहीत. प्रवाशांना बस पकडण्यासाठी नाशिक किंवा येवला येथे धाव घ्यावी लागते. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा तिहेरी फटका बसतो. विशेषतः वृद्ध आणि महिला प्रवाशांना यातून मोठी गैरसोय सहन करावी लागते.
अस्वच्छतेचा कळस
बसस्थानक परिसरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. शौचालयांची अवस्था बिकट असून, दुर्गंधीमुळे त्यांचा वापर करणे अशक्य झाले आहे. पिण्याच्या पाण्याची कोणतीही सोय नाही. नळ कोरडे पडलेले आहेत. प्रतीक्षालयातील आसने तुटलेली असून, रात्री पुरेशा प्रकाशाची सोय नसल्याने प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागतो.
विंचूर बसस्थानकात टॉयलेटची बिकट अवस्था आहे. नागरिक बसस्थानकातच दारू पित बसतात. काही बस स्थानकात न थांबता थेट चौफुलीवर थांबतात, त्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास संभाजीनगर–नाशिक महामार्गावर तीव्र आंदोलन केले जाईल," असा इशारा विंचूर ग्रामपालिका सदस्य राजेंद्र मोरे यांनी दिला.
महामंडळाकडे नागरिकांची मागणी
स्थानिक नागरिकांनी एस.टी. महामंडळाकडे मागणी केली आहे की,लांब पल्ल्याच्या बसना विंचूर येथे थांबा द्यावा,बसस्थानकाची स्वच्छता, पाण्याची व प्रकाशाची सोय तातडीने सुधारावी,शौचालये व प्रतीक्षालयाची दुरुस्ती करावी.
महामंडळाच्या सातत्याने दुर्लक्षामुळे प्रवाशांची गैरसोय वाढत असून, प्रशासनाने लवकरात लवकर लक्ष न दिल्यास आंदोलनाची ठिणगी पेटण्याची शक्यता आहे.

काम पूर्ण झाल्यानंतर बस डेपो अधिकारी सुनीता काळे यांनी स्वतः बसस्टँडवर भेट देऊन पाहणी केली मात्र, या सुधारणा असूनही काही बसचालक बसस्टँडवर थांबा घेत नाहीत, अशी तक्रार नागरिकांनी केली आहे. ग्रामस्थांनीही त्यांच्या भूमिकेला पाठिंबा दर्शवला असून प्रवासी सोयीसाठी सर्व बसेसनी नियमानुसार थांबा घ्यावा, अशी मागणी केली आहे.

> ग्रामपंचायत सदस्य राजू मोरे "बसस्टँडवरील सुविधा सुधारल्यानंतरही काही बसचालक थांबा घेत नसल्याने प्रवाशांना त्रास होतो आहे. जर ही परिस्थिती कायम राहिली, तर ग्रामस्थांसह आम्ही रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल " असा इशारा राजू मोरे यांनी दिला.

या घटनेमुळे "दैनिक युवक आधार"च्या बातमीचा परिणाम म्हणून बसस्टँड परिसरात मोठे बदल झाले असून आता प्रवाशांच्या सोयीसाठी प्रशासनाकडून पुढील पावले उचलण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## आष्टी तालुक्यातील पदवीधरांनी मोठ्या संख्येने नावनोंदणी करावी – अविनाश कदम

### पदवीधर मतदारांना नावनोंदणीसाठी अंतिम ३ दिवस शिल्लक

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :मारुती सत्रे**

छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदार संघांची निवडणुक जाहीर झाल्यानंतर नावनोंदणी सुरू झाली होती

पण अंतिम तारीख ६ नोव्हेंबर रोजी असल्याने नोंदणीसाठी फक्त तीन दिवस शिल्लक असल्याने उर्वरित सर्व पदवीधर मतदारांनी मोठ्या संख्येने नावनोंदणी करून घेण्याचे आवाहन मराठी पत्रकार परिषद संलग्न आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी केले आहे.



ही नावनोंदणी सर्वच पदवीधर मतदारांसाठी अनिवार्य आहे. ज्यांनी मागील निवडणुकीत आपले नाव नोंदवून घेतले होते, त्यांनासुद्धा यावेळी नव्याने नावनोंदणी करणे गरजेचे आहे.

१ नोव्हेंबर २०२२ पूर्वी पदवी प्राप्त झालेले सर्व विद्यार्थी या मतदारसंघात मतदान करू शकतात त्यांनी नावनोंदणीसाठी नमुना अर्ज क्र. १८ संपूर्ण निळ्या किंवा काळ्या शाईने मराठी किंवा इंग्रजी भाषेत भरलेला आणि कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या पदवी प्रमाणपत्राची किंवा पदवीच्या अंतिम वर्षाच्या मार्कशीटची झेरॉक्स प्रत व एक पासपोर्ट साईज फोटो, अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी दुसरा फोटो चिटकवून ठेवावा आणि मतदान ओळखपत्र किंवा आधार कार्ड यापैकी एकाची प्रत व सर्व कागदपत्रे घेऊन अर्ज आष्टी येथील तहसील कार्यालयातील निवडणूक विभागात सादर करावे. अर्जासोबत दिलेले फोटो स्टेपल करून द्यावा तसेच ओळखपत्राची प्रत पारदर्शक करून द्यावी.

फक्त तीन दिवस शिल्लक असल्याने, सर्व उर्वरित पदवीधर मतदारांनी लगेच आपले नावनोंदणी अर्ज दाखल करावेत असे आवाहन मराठी पत्रकार परिषद संलग्न आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष जावेद पठाण, सचिव गहिनीनाथ पाचबेल, कार्याध्यक्ष अक्षय विधाते, प्रा. निसार शेख, संपादक सय्यद बबलु, पत्रकार समीर शेख, ॲड. किशोर निकाळजे, जेष्ठ पत्रकार राजेंद्र लाड, पत्रकार संतोष नागरगोजे, प्रेम पवळ, अतुल जवणे, कृष्णा पोकळे, मारूती संत्रे, सोपान पगारे, आदिनाथ ठोंबरे आदींनी केले आहे.

## बौद्ध स्मशानभूमी रस्ता बांधकामासाठी निधी मंजूर — अशोकराव चव्हाण साहेबांचे मन:पूर्वक अभिनंदन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी योगेश चौदंते**

दि. 13 ऑगस्ट 2023 रोजी माजी मुख्यमंत्री तथा मा.खा. अशोकरावजी चव्हाण साहेब यांना मुदखेड येथील बौद्ध स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पूल, रस्ता आणि दुतर्फे नाली बांधकामासाठी निधी मंजूर करण्याबाबत अर्ज सादर करण्यात आला होता.

या मागणीची दखल घेत मा.खा. अशोकरावजी चव्हाण साहेब यांनी संबंधित कामासाठी निधी मंजूर केला आहे. या निर्णयामुळे स्थानिक नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, बौद्ध समाजासह परिसरातील रहिवाश्यांनी साहेबांचे मन:पूर्वक आभार व्यक्त केले आहेत.

या मागणीसाठी पुढाकार घेऊन प्रयत्न करणारे कुणाल चौदेंते यांनी म्हटले की,



"साहेबांच्या सहकार्यामुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेले हे काम आता मार्गी लागणार असून नागरिकांना मोठा दिलासा मिळेल."

स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी मा.खा. अशोकरावजी चव्हाण साहेब यांचे अभिनंदन करून कृतज्ञता व्यक्त केली.

## मारुती (माऊली) खेडकर टाकळीमानुर पंचायत समिती गानातून रिंगणात

### टाकळीमानुर गणाचा सर्वांगीण विकास हा मुख्य अजेंडा. सर्वसामान्यांसाठी काम करणार

**दैनिक युवक आधार**
**उरण प्रतिनिधी राम ढाकणे**

जिल्हा अहिल्यानगर पाथर्डी पंचायत समितीच्या निवडणुकीचे सध्या वारे वाहू लागले आहेत. या निवडणुकीत सर्व सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी युवक वर्गाकडून मागणी होत आहे. मारुती (माऊली) खेडकर हे टाकळीमानुर गनातून उमेदवारी करणार असल्याचे समजते, त्यांच्या या निर्णयाने राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे.

तीनखडी या गावातील एक सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगा मारुती (माऊली) खेडकर हे समाज सेवा वृत्ती तसेच त्यांच्या कर्तृत्वाच्या जोरावर एक उमदा समाजसेवक आणि एक युवा उद्योजक, म्हणून त्यांची ओळख आहे. लढणारे नेतृत्व म्हणून परिचित आहेत, सामाजिक कार्यामध्ये त्यांनी सतत नावलौकिक मिळवले असून, शेतकरी, युवक, आणि महिलांच्या प्रश्नावर त्यांनी सातत्याने भूमिका मांडल्या आहेत, लोकांचा विश्वास संपादन केला आहे, म्हणून त्यांच्या उमेदवारीला मतदारांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे.

स्थानिक लोकांनी मारुती (माऊली) खेडकर यांना पसंती दाखवली आहे यांचे नेतृत्व तळागाळातील जनतेला जोडणार आहे, त्यांनी गनातील गावोगावी फिरून जनतेच्या समस्या जाणून घेतल्या आणि अनेक वेळा प्रशासनासमोर त्या मांडल्या देखील. त्यामुळे त्यांचा विजय निश्चित होणार अशी सदिच्छा जनतेकडून मिळत आहे.



निवडणूक लाडण्याच्या निर्णया नंतर मारुती माऊली खेडकर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, जनतेचा विश्वास आणि त्यांचा सर्वांगीण विकास हेच माझं ध्येय आहे. टाकळीमानुर गनाचा सर्वांगीण विकास, प्रामुख्याने हा माझा अजेंडा आहे.

दरम्यान त्यांनी गावोगावी जाऊन मतदारांच्या भेटीगाठी सुरू केल्या आहेत तसेच तरुण वर्गांशी समन्वय साधण्यासाठी आणि पुढील नियोजन करण्यासाठी मतदारांच्या भेटीगाठी घेत आहेत.

## संदीप ढंगारे आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्काराने सन्मानित

### केंद्रीय राज्यमंत्री आदरणीय प्रतापरावजी जाधव यांच्या हस्ते पुरस्कार प्राप्त..

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

मालेगाव तालुक्यातील पिंपळा येथील संदीप ढंगारे यांना आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.सन 2017 ते सन 2018 या वर्षाकरिता हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. संदीप ढंगारे बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यातील ग्रामपंचायत मडाखेड (खु)या गावांमध्ये ग्रामपंचायत अधिकारी म्हणून काम पाहत होते.गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान अमरावती विभागातून राज्यस्तरीय प्रथम क्रमांक पटकावून बाजी मारली आहे. संदीप ढंगारे कार्यरत असतानीं त्यांनी कोणत्याही



प्रकारचा भेदभाव न करता किंवा आपल्या कामात दिरंगाई न करता सर्वसामान्य जनतेचे कामे एकही रुपया न घेता ताबडतोब कशा प्रकारे करता येईल आणि त्यांना कशाप्रकारे आपल्या पदाच्या माध्यमातून न्याय देता येईल हेच काम फक्त संदीपजी ढंगारे यांनी पाहिलं आज त्यांच्या चांगुलपणाच्या कामाचा गुणगौर म्हणून केंद्रीय राज्यमंत्री सन्माननीय प्रतापरावजी जाधव साहेब यांच्या हस्ते आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.सध्या संदीपची ढंगारे हे रिसोड तालुक्यातील पिंपरी सरहत,कंकरवाडी येथे ग्रामपंचायत अधिकारी म्हणून काम पाहत आहेत तिथे सुद्धा ते आपल्या पदाचा दुरुपयोग न करता सर्वसामान्यांना कोणत्या प्रकारचा त्रास न देता किंवा एकही रुपया न घेता सर्वसामान्यांचे कामे ताबडतोब करत असतात.आदर्श ग्रामपंचायत पुरस्काराने सन्मानित झाल्यानंतर सर्व स्तरावरून श्री.संदीपजी ढंगारे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

> श्री.संदीप ढंगारे यांना आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार तर मिळालाच आहे पण संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अमरावती विभागातून सुद्धा प्रथम क्रमांक पटकावून बाजी मारली आहे.आपल्या पिंपळा गावाचे नाव त्यांनी अमरावती विभागाच्या नकाशावर कोरले आहे यावेळी गावकरी मंडळी कडून त्यांचं मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे..

## वालचंदनगर पोलिसांच्या मिनी मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद; राष्ट्रीय एकता दिनानिमित्त परिसरातील खेळाडूंची उपस्थिती




**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त वालचंदनगर पोलिस ठाण्याच्या वतीने राष्ट्रीय एकता दिनाच्या निमित्ताने आयोजित मिनी मॅरेथॉन स्पर्धेला नागरिक विद्यार्थी खेळाडू व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या स्पर्धेत 150 हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला.ही मॅरेथॉन अंथुरणे ते वालचंदनगर या मार्गावर पार पडली.चार किलोमीटर मुली व ज्येष्ठ नागरिक गट तसेच आठ किलोमीटर खुला गट अशा दोन विभागांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेचे उद्घाटन वालचंदनगरचे स.पो.नि.राजकुमार डुणगे यांच्याअध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली यावेळी प्रमुख पाहुणे उपस्थित होते.स.पो. नि.राजकुमार डुणगे यांनी सर्व सहकाऱ्यांचे आभार मानत सांगितले की "राष्ट्रीय एकता जपण्यासाठी असे उपक्रम सातत्याने राबवले पाहिजेत सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याचा आदर्श आपल्या कृतीतून दिसला पाहिजे.या कार्यक्रमाच्या शेवटी सहा. पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे यांनी सर्व स्पर्धकांना राष्ट्रीय एकता राखण्याची शपथ दिली विजेत्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले तर एकतेचा संदेश आणि क्रीडा संस्काराचा संगम ठरलेली ही मिनी मॅरेथॉन वालचंदनगर पोलिसांच्या पुढाकारामुळे तालुक्यात विशेष ठरली.या स्पर्धेसाठी पोलीस हवालदार गणेश काटकर अभिजीत कळसकर गुलाबराव पाटील अजित थोरात परिमल मानेर मोहिते यांनी विशेष परिश्रम घेऊन स्पर्धा यशस्वी पार पाडली.

## मुंबईतील रक्ततुटवड्यावर टायगर ग्रुपच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर (केतन भोज) :**

मुंबईमध्ये सध्या रक्ताचा तुटवडा जाणवत असताना,टायगर ग्रुप मुंबई प्रदेशच्या वतीने सामाजिक आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला आहे.टायगर ग्रुपचे राष्ट्रीय अध्यक्ष पै.डॉ.तानाजी भाऊ जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त असल्फा येथील नालियावाला भानुशाली हॉल येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.अलीकडील काही दिवसांपासून मुंबईतील विविध रक्तपेढ्यांमध्ये रक्तसाठा कमी झाल्यामुळे रुग्णालयांना



आवश्यक रक्तपुरवठा करण्यात अडचणी येत होत्या.अनेक रुग्णांना वेळेवर रक्त न मिळाल्याने गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती.या पार्श्वभूमीवर प्रशासनाने विविध संस्था,सामाजिक संघटना आणि महाविद्यालयांना रक्तदान शिबिरे आयोजित करण्याचे आवाहन केले होते. या सामाजिक आव्हानाला प्रतिसाद देत टायगर ग्रुपने पुढाकार घेत आदर्श उभारला आहे.या शिबिराचे आयोजन टायगर ग्रुप मुंबई अध्यक्ष संजय भाऊ खंडागळे आणि समाजसेविका छायाताई खंडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

तर घाटकोपर तालुका अध्यक्ष राहुल पवार आणि चांदिवली तालुका अध्यक्ष प्रशांत शर्मा यांच्या पुढाकाराने संपूर्ण कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. शिबिरात शंभरहून अधिक रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत समाजाप्रती आपले कर्तव्य बजावले.अनेक नवयुवकांनी या उपक्रमात पहिल्यांदाच रक्तदान केले असून,टायगर ग्रुपने त्यांचा सन्मान करून अधिकाधिक युवकांना पुढे येण्याचे आवाहन केले.टायगर ग्रुपचे मुंबई अध्यक्ष संजय भाऊ खंडागळे म्हणाले,"मुंबईत रक्ताचा तुटवडा हा गंभीर विषय बनला आहे.

म्हणूनच आम्ही राष्ट्रीय अध्यक्ष तानाजी भाऊ जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त इतर सामाजिक उपक्रमांसोबत हे रक्तदान शिबिर आयोजित केले आहे.प्रत्येक तरुणाने वर्षातून किमान दोनदा रक्तदान करावे - हेच खरे राष्ट्रसेवेचे कार्य आहे."

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# सुरेशराव आपण आमदार असल्यासारखे बोलावे,वागावे, आम्हांला फुगेवाले समजु नका,आम्ही मतदार संघातीलच आहोत - माजी आ. भीमराव धोंडे यांचे आ.धस यांना प्रत्युत्तर

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :मारुती सत्रे**

सुरेशराव धस साहेब अहो तुम्हांला बीड जि.प.चे उपाध्यक्षपद कुणामुळे मिळाले ? विधानसभा निवडणुकीत आम्ही तुमच्या जिंदाबादच्या (वय विसरुन) घोषणा दिल्या होत्या. त्यावेळी तुम्ही निवडून आलात, राज्यमंत्री झालात.हे सोयीस्कर विसरु नका. उपकाराची परतफेड अपकारने करण्याची तुमची सवय आहे. महेश (कडा) सहकारी सखर कारखान्याचे लायसन्स दि.८ एप्रिल २०२४ म्हणजे सोळा महिन्यापुर्वी रद्द झालेले आहे. आमदार महोदय त्यावेळेस आमचे संचालक मंडळ नव्हते.ते संचालक मंडळ तुम्हीच जॉईंट डायरेक्टरला सांगुन रद्द केले होते.आम्ही शासनाकडे अपील केले होते.दि.२५ फेब्रुवारी २०२५ रोजी आमचे संचालक मंडळ पुर्नस्थापीत झाले.महाराष्ट्रातील अनेक सहकारी साखर कारखाने १० ते २० वर्षापासून बंद आहेत त्यांचे लायसन्स रद्द झालेले नाहीत.आमच्या सहकारी साखर कारखान्याचे लायसन्स कुणी व कसे रद्द केले हे ऊसउत्पादक शेतकरी,मतदार संघातील जनतेला माहित आहे.

यशवंत (थेऊर), शंकर (यवतमाळ), शिवशक्ती,सुधाकर नाईक सहकारी साखर अशी अनेक कारखान्याचे उदा. आहेत.सुरेशराव आपण आमदार असल्यासारखे बोलावे,वागावे, आम्हांला फुगेवाले समजु नका,आम्ही मतदार संघातीलच आहोत असे माजी आ.भीमराव धोंडे यांनी आ.धस यांना आज पत्रकार परिषद घेऊन प्रत्युत्तर दिले.

महेश (कडा) सहकारी सखर कारखान्याचे लायसन्स प्रकरणात सध्या आजी -माजी आमदारात कलगीतुरा रंगला आहे.माजी आ.धोंडे पुढे म्हणाले की, आ.सुरेश धस यांना आपण २००९ च्या विधानसभा निवडणुकीत मदत केल्यामुळे ते मंत्रिमंडळात दिसले. हे त्यांनी विसरु नये. मी त्यांना ब-याचवेळा राजकीय मदत केलेली आहे.त्यांनी मला एकदाही मदत केली नाही. ऊलट माझ्या विरोधातील उमेदवारला मते देऊन माझा पराभव केला आहे. आमदारांनी आमदारासारखे वागावे.या आ.धस यांना उपकाराची परतफेड अपकाराने करण्याची सवय असल्याचा आरोप माजी आ.भीमराव धोंडे यांनी आ.सुरेश धस यांच्यावर केला आहे.

आष्टीचे आ.सुरेश धस यांनी पत्रकार परिषद घेऊन माजी आ.भीमराव धोंडे यांच्यावर केलेल्या आरोपाला उत्तर देण्यासाठी आष्टी येथील आनंद भवन येथे आज रविवार दि.२ नोव्हेंबर रोजी दुपारी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत माजी भीमराव धोंडे बोलत होते.



पुढे बोलतांना ते म्हणाले,आमच्या कारखान्याचे लायसन्स हे दि.८ एप्रिल २०२४ रोजी परंतु पुन्हा संचालक मंडळ २५ फेब्रुवारी २०२५ स्थापन झाले आहे.महाराष्ट्रामध्ये १० ते २० वर्षांपासून बंद असूनही त्यांचे परवाना रद्द झाले नाहीत. जे नियमानुसार कामगारांचे देणे आहे ते देण्यास आमचे संचालक मंडळ बांधील आहे.उलट आमदार महोदयांनी २००७ ते २००८ हे दोन वर्ष कारखाना चालविला त्यांचे कामगारांचा पीएफ फंड दिला नाही,विशेष म्हणजे आ.धस यांनी सुपरटेक कंपनीचे थकविलेले ३ कोटी २८ लाख रुपये भाडे आमच्या संचालक मंडळाने भरले आहेत.आ.धस यांनी आम्ही हे करू ते करु अशा धमक्या देऊ नयेत. आम्हीही मतदार संघातीलच आहोत.असे बोलणे आमदारांना शोभत नाही.त्यामुळे आमदारांनी आमदारासारखे वागावे असाही सल्ला ही धोंडे यांनी दिला.

महेश सहकारी साखर कारखाना विक्रीला निघाला होता. शेतकऱ्यांचा कारखाना होता. म्हणून आपण तो घेतला नाही. जुन्या नेत्यांनी खुप कष्टाने हा सहकारी साखर कारखाना उभा केला होता.ज्यांनी कारखाना सुरु केला ते आता हयात नाहीत. आपण निवडणुकीत तो कारखाना जिंकला ऊस क्षेत्र वाढले आहे. इतर पिके परवडत नाहीत. त्यामुळे परवाना मिळविण्यासाठी खुप प्रयत्न केले आहेत.मुख्यमंत्री,

उपमुख्यमंत्री व इतरांना भेटलो आहे.खाजगी कारखान्यासाठी हा सहकारी साखर कारखाना बंद पाडू नका.महेशचे लायसन्स तर मिळणारच आहे. सरकार सहकारी तत्वावरचा कारखाना मोडीत काढणार नाही.१५ दिवसात महेशला लायसन्स मिळाले नाही तर आम्ही पुणे येथील साखर आयुक्तांच्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करणार आहोत.

मला दोन चार पक्षात गेलो फिरलो म्हणता... तुमचा राजकीय प्रवासही जनतेला माहितच आहे. राजकीय कार्यकर्ता आपआपल्या सोयीने राजकारण करतो.पक्ष निवडतो.. तुम्ही राष्ट्रवादीतुन भाजपात,भाजपा मधुन राष्ट्रवादीत गेलेले आहात..हे जनता अजुन विसरली नाही.मी लोकशाही पध्दतीने वागणारा कार्यकर्ता आहे. धाकदडपशाही करुन राजकारण करणारा नाही. आमदारसाहेब आम्हांला कारखान्याबाबत त्रास देण्यापेक्षा तुम्ही कराराने महेश कारखाना चालवयला घ्या.. आम्ही कराराने हा साखर कारखाना तुम्हांला चालवण्यास देण्यास तयार आहोत.महेश साखर कारखान्याचे कामगारांच्या पगाराबाबत बोलताना धोंडे म्हणाले की,आमच्या बॅलेन्ससीटप्रमणे २ कोटी ३४ लाख रु. कामगारांचे पगार देणे बाकी आहे. कारखाना सुरु झाला तर टप्प्याटप्प्याने पगार दिले जातील. कारखान्याच्या जमीनीवर कामगारांच बोजा टाकल्याची पध्दती चुकीची आहे.ती नोंद रद्द करण्याचे काम कारखान्याचे संचालक मंडळ करणार आहे असेही माजी आ.धोंडे यांनी शेवटी सांगीतले.

कॅन्सर हॉस्पीटलच्या उभारणीबाबत बोलताना धोंडे म्हणाले की, या हॉस्पीटलच्या उभारणीसाठी संस्थेतील काही कर्मचाऱ्यांनी चांगल्या व मदतीच्या भावनेतुन आर्थिक मदत केली असेल तर ते तुम्हांला खुपण्याची गरज नाही.ऊलट तुम्ही या मतदार संघाचे लोकप्रतिनिधी आहात तुम्ही पुढे होऊन तुमच्या इमदर फंडातुन ५० लाख रु मदत द्यावी. मी आमदार असताना तुम्ही राज्यस्तरीय सामने भरविले होते त्या कामास मी आमदार फंडातुन निधी दिलेला आहे.

सामाजिक काम व गोरगरीब कॅन्सर पीडीतांची सोय होणार आहे म्हणून आ.धससाहेब आपण शासनाच्या विविधा योजनातुन २५ कोटी रु चा निधी या हॉस्पीटलसाठी मिळवुन द्यावा.मी आपले अभिनंदन करीन.. आभार मानण्यास तयार आहे. असे माजी आ.धोंडे म्हणाले.




**मुदखेड शहरात आयोजित कार्यक्रमात माननीय आमदार श्रीजया अशोकराव चव्हाण यांच्या पुष्पगुच्छ देऊन हार्दिक स्वागताचा समारंभ संपन्न झाला. या प्रसंगी नितीन भाऊ चौदंते यांनी आमदार श्रीजया चव्हाण यांचे स्वागत करूनशुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास स्थानिक कार्यकर्ते, नागरिक तसेच पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. आमदार श्रीजया चव्हाण यांनी उपस्थितांशी संवाद साधत मुदखेडच्या विकासकामांबाबत चर्चा केली आणि येणाऱ्या काळात विकासाची गती अधिक वाढविण्याचा निर्धार व्यक्त केला. ( दैनिक युवक आधार)**

## श्रीसद्‌गुरु हरिहर महाराज अवतार प्रकट दिनाच्या निमित्ताने श्रीमद् भागवत कथेला व इतर धार्मिक कार्यक्रमाला भाविक भक्तांचा भरघोस प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी रघुनाथ देवकर**

गुरुभक्ती भूषण महंत हरिहरनंदन महाराज व गुरुभक्ती परायण रामानंद महाराज यांच्या नियोजनाखाली श्री सद्गुरु हरिहर महाराज मूर्ती व समाधी मंदिर( मठ) पंढरपूर या ठिकाणी तपोनिष्ठ सद्गुरु हरिहर महाराज यांच्या प्रकट दिनाचे औचित्य साधून दिनांक २८/ १० /२५ते ३/११/२५ पर्यंत धार्मिक कार्यक्रमांची मांदियाळी सुरू आहे. या ठिकाणी श्रीमद् भागवत कथा व काकड आरती भजन कीर्तन हरिपाठ जागर अशा अनेक धार्मिक




कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला महाराष्ट्रातून अनेक जिल्ह्यातून भाविक भक्त मोठ्या श्रद्धेने दररोज उपस्थिती वाढवीत असल्याचे चित्र दिसून आले.

या धार्मिक कार्यक्रमामुळे भाविक भक्तांच्या चेहऱ्यावरती आनंदी आनंद दिसून आला. कार्यक्रमाचे आयोजन ह. भ. प .महंत हरिहर गुरुभक्ती भूषण हरिहर नंदन महाराज व गुरुभक्तिपरायण रामानंद महाराज यांच्या शिष्यांनी अतिशय नेटक्या स्वरूपाने केल्याचे दिसून आले. महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांच्या अमृतवाणीतून या ठिकाणी भाविक भक्तांना मोठ्या प्रमाणामध्ये लाभ मिळाल्याचे बोलले जात आहे.

## योग्य चौकशी करून गोरगरीबांना न्याय मिळाला नाही तर मनसे कडून जोडे मारो अंदोलन करण्याचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**देगलूर वार्ताहर**

भारत देश हा कृषि प्रधान देश असून येथे गोरगरीबांची संख्या जास्त असल्यामुळे व अनेक गोरगरीबांना राहण्याची सोय नसल्यामुळे शासनाने घरकुल आवास योजना व रमाई आवास योजना सुरू केली आहे.

परंतू ग्रामीण भागातील ग्रामपंचायत कार्यालयातील ग्रामसेवक यांच्या संगणमताने घरकुल योजनेतील लाभार्थ्यां कडून घरकुल मंजूरीसाठी व बिले मंजूर करण्यासाठी अमाप पैसे उकळण्याचा प्रकार घडत आहेत.

असाच प्रकार देगलूर तालुक्यांतील मौजे येडूर येथील ग्रामपंचायत कार्यालयाचे ग्रामसेवक पंढरीनाथ पांढरे यांनी घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांकडून घरकुल मंजूर करणे व बिले मंजूर करण्यासाठी देगलूर येथे बोलावून किमान दोन बिले मंजूर करण्यासाठी पंधरा हजार रुपये घेत आहेत व तुमचे गाव चाळीस किलोमिटर लांब असल्यामुळे मला दररोज येने शक्य नाही असे



बोलून गोरगरीब जनतेला लुबाडत आहेत अशी तक्रार मनसेचे तालूका सचिव भिमराव येरणवाड यानी देगलूर पंचायत समितीच्या अधिकाऱ्यासमोर गाऱ्हाणे मांडले व या घरकुलात गोरगरीब जनतेला लुबाडण्याचे काम करीत असल्यामुळे यांची तात्काळ चौकशी करून यांच्यावर कारवाई करण्यात यावी व गोरगरीब जनतेला न्याय मिळवून द्यावा अन्यथा जोडे मारो अंदोलन करण्यात येईल असे मनसे तालूका सचिव भिमराव येरणवाड व मनसेच्या पदाधिकाऱ्यांकडून निवेदन देण्यात आले आहे.

# माजी उपनगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांना नगराध्यक्ष पदाचा उमेदवार म्हणून घोषित

### शहराच्या विकासाचे नवे धोरण आखण्यासाठी निवडणूक लढवूया - आ. महेंद्र थोरवे

**दैनिक युवक आधार**
**खोपोली वार्ताहर**

अधिकृत घोषणेला शिक्कामोर्तब करणारे शिवसेनेची बुलंद तोफ आमदार महेंद्र थोरवे यांचा खोपोली नगर परिषदेच्या निवडणुकीच्या दिशेने प्रथम प्रहार पाहायला मिळाला.

सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, अध्यात्मिक अशा विविध क्षेत्रात नाविन्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या अभ्यासू, उच्च शिक्षित युवा नेतृत्वास खोपोली नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदासाठी संधी देत उमेदवार म्हणून आमदार महेंद्र शेठ थोरवे यांनी नाव जाहीर केल्याने माजी उपनगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिक आगामी होणारी नगरपालिकेची निवडणूक लढणार असल्याचे स्पष्ट झाले आहे . आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते खोपोली शहरातील विकास कामांच्या भूमिपूजन प्रसंगी लोक उपयोगी कार्यातून आधुनिक शहर करण्यासाठी आपण साऱ्यांनी विकासकार्य करूया असे सांगत नगराध्यक्षपदाचा उमेदवार म्हणून कुलदीपक शेंडे यांच्या नावाची घोषणा केली .यावेळी व्यासपीठावर उपस्थित कुलदिपक शेंडे यांनी आपल्यावर ठेवलेला पक्ष नेतृत्वाचा विश्वास पाहून विनम्रतेने आपल्या देहबोलीतून नमस्कार करून पक्षश्रेष्ठींची आभार मानले .यावेळी उपस्थित नागरीक व शिवसैनिकां मध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला यावेळी अनेकांनी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यसम्राट आमदार थोरवे साहेब खोपोली शहराच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करत असताना मागील काळातील झालेल्या विकास कामांच्या जोरावर आपण ही निवडणूक लढवत असून सर्वसामान्य जनता आपल्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे ,येत्या काळात नगराध्यक्ष म्हणून फक्त मी नव्हे तर तुम्ही सर्व खोपोलिकर हेच कुलदीपक शेंडे असा संदेश पाठवा,जनतेचे सेवक म्हणून शहराच्या विकासासाठी सर्वच प्रभागातून उमेदवार निवडून येण्यासाठी संघटित कार्य करूया आणि पालिकेत मोठया संख्येने नगरसेवक पाठवून आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वाखाली खोपोली नगर परिषदेची सत्ता विकासासाठी मिळवूया असा संदेश माजी उपनगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांच्या वतीने देण्यात आला. या घोषणे नंतर आता महायुतीतील मित्रपक्ष व महाविकास आघाडीतील अनेक विरोधी पक्ष या निवडणुकीत उमेदवार देताना काय निर्णय घेतील याकडे संपूर्ण खोपोलीकरांचे लक्ष लागले आहे.

# खेडलेझुंगे रस्त्यावर अपघात नव्हे, हत्याच !

## अपघाताच्या आड लपलेली हत्या उघडकीस; पोलिसांनी दाखल केला थरकाप उडवणारा खुनाचा गुन्हा

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**खेडलेझुंगे :** दि. १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास खेडले ते ब्राम्हणवाडे रस्त्यावरील गोदावरी नदीच्या पुलावर झालेल्या भीषण अपघाताने परिसर हादरला होता. या घटनेत पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला होता. परंतु पोलिस तपासात या घटनेमागे पूर्वनियोजित हत्या असल्याचे धक्कादायक वास्तव उघडकीस आले आहे. यानंतर सायखेडा पोलिसांनी चारचाकी चालकावर खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

या प्रकरणी फिर्यादी विश्वनाथ एकनाथ दराडे (वय २९, व्यवसाय वकील, रा. खंबाळे, ता. सिन्नर) यांनी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत त्यांनी नमूद केले की, दि. १ नोव्हें रोजी जमिनीच्या वाटपाच्या कारणावरून फिर्यादीचे मयत मोठे भाऊ व वहीणी यांच्यासोबत आरोपी भाऊसाहेब सखाहरी साबळे (रा. डोंगरगाव, ता. निफाड) याचा वाद झाला होता.

वादानंतर आरोपीने सूडभावनेने आपल्या ताब्यातील इको चारचाकी (क्र. एमएच १५ जेएस १९५४) घेऊन फिर्यादीच्या



भावाच्या मोटारसायकल (क्र. एमएच १५ बीवाय ५७२५) चा डोंगरगावपासून पाठलाग केला. खेडलेझुंगे ते ब्राम्हणवाडे रस्त्यावरील गोदावरी नदीच्या पुलावर आरोपीने मोटारसायकलला जाणीवपूर्वक जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला.

या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम १०३(१), ३५२, ३५१(३) अंतर्गत खुनाचा गुन्हा नोंदवण्यात आला असून आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. पुढील तपास सपोनि ढोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## विकासाचा गोडवा जनतेच्या मनात!"; मा. राजेशदादा व पुनमताई ताईंच्या प्रेरणेने रमेश गौड यांच्याकडून मिठाई वाटप

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी : गिरमाजी सुर्यकार**

दिवाळीनंतर धर्माबाद शहरात विकासाची नवी पहाट उगवताना आनंदोत्सवाचे वातावरण पाहायला मिळाले. नायगाव मतदारसंघाचे कार्यसम्राट मा. आमदार राजेशदादा पवार यांच्या आदेशाने व सौ. पुनमताई पवार यांच्या मार्गदर्शनाखाली माजी शहराध्यक्ष रमेश गौड यांच्या नेतृत्वात 'विकास सोहळ्याची गोड सुरुवात' या उपक्रमांतर्गत नागरिकांमध्ये घरोघरी मिठाई वाटप करण्यात आले.

अलीकडेच धर्माबाद शहरासाठी आमदार राजेश पवार यांनी कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ केला असून, रस्ते, ड्रेनेज, पाणीपुरवठा, शैक्षणिक सुविधा व सौंदर्यीकरणाच्या कामांमुळे शहराच्या विकासाचा वेग वाढला आहे. या कामांच्या प्रारंभानंतर आमदार पवार यांनी जनतेशी संपर्क राखण्यासाठी आणि त्यांच्या आनंदात सहभागी होण्यासाठी मिठाई वाटपाचा उपक्रम राबवण्याचे आदेश दिले.

या पार्श्वभूमीवर माजी शहराध्यक्ष रमेश गौड यांनी कार्यकर्त्यांसह शहरातील आनंद नगर, समता नगर, रामनगर, शंकरगंज, इंदिरानगर, सिद्धार्थ नगर, व्यंकटेश्वर नगर तसेच धर्माबाद शहरातील सर्व प्रभागांमध्ये जाऊन नागरिकांना मिठाई वाटली. प्रत्येक घरात आमदार पवार यांच्या विकासाचे आणि नेतृत्वाचे संदेश पोहोचवून नागरिकांशी आत्मीय संवाद साधण्यात आला.

यावेळी नागरिकांनी या गोड उपक्रमाचे स्वागत बरोबरच



धर्माबाद शहरातील विविध भागांमध्ये झालेले आजवरचे विकास पाहता माननीय आमदार राजेश पवार व भारतीय जनता पक्षाला भरघोस मतदान करण्याचे नागरिकाने आश्वासन दिले. तसेच "धर्माबादचा विकास म्हणजे आमदार पवार यांचे वचनपूर्तीचे प्रतीक" असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमात नगरसेवक, भाजपा पदाधिकारी, महिला आघाडी, युवक मोर्चा व असंख्य कार्यकर्ते उत्साहाने सहभागी झाले होते.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचा उडतोय धुरळा; महत्त्वाचे प्रश्न सध्या चर्चेत

### निवडणुकीतील उमेदवारांची गुणवत्ता तपासणार कोण?

**दैनिक युवक आधार**
**पेण दीपक लोके**

जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका निवडणुकीचा बिगुल वाचतात निवडणुकांसाठी तालुक्यातील तालुक्यात विविध पक्षातील इच्छुक उमेदवारांची प्रचंड धडपड सुरू झाल्याचे चित्र दिसू लागले आहे मात्र जनतेचे प्रतिनिधी होण्यासाठी इच्छुक असणाऱ्यांची गुणवत्ता लोकसभेची बांधिलकी शिक्षण आणि स्वच्छ प्रतिमा तपासणार कोण हा महत्त्वाचा प्रश्न सध्या मतदारांमध्ये चर्चेत आहे.मागील काही निवडणुकींच्या राज्यातील अनुभवातून पैशाच्या जोरावर तिकीट मिळवणारे आणि निवडून आल्यानंतरही जनतेच्या प्रश्नापासून दूर राहणारे लोकप्रतिनिधी मोठ्या प्रमाणात दिसून येतात त्यामुळे आता मतदारसंघ झाले आहेत लोकशाही टिकवण्यासाठी आणि ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी इच्छुक असणाऱ्या उमेदवारांची गुणवत्ता हा पहिलाच निकष असावा अशी भावना अनेक नागरिकांकडून चर्चेद्वारे व्यक्त केला जात आहे.आगमी निवडणुका म्हणजे केवळ राजकीय सत्तेचा बदल नाही तर ग्रामीण व शहरी विकासाची दिशा निश्चित करणारा टप्पा आहे त्यामुळे सक्षम स्वच्छ प्रतिमेचे आणि काम करण्याची क्षमता असणाऱ्या व्यक्ती लोकप्रतिनिधी म्हणून पुढे यायला हवेत अशी अपेक्षा मतदारांमध्ये वाढत आहे

उमेदवारांच्या भूमिकेवर नागरिकांचे जीवनमान उंचावणे अवलंबून असते स्थानिक विकास, नागरी सुविधा, शैक्षणिक सुधारणा, आरोग्यसेवा, रोजगार निर्मिती यासारख्या महत्त्वाच्या प्रश्नावर निर्णय घेण्याची जबाबदारी या लोकप्रतिनिधींकडे असते त्यामुळे सक्षम नेतृत्वाची गरज अधिक प्रकर्षाने पुढे येते. ज्येष्ठ राजकीय नेत्यांच्या मते उमेदवारांच्या गुणवत्तेकडे लक्ष देण्यासाठी नागरिक सामाजिक संघटना आणि पक्ष कार्यकर्त्यांनी ही पुढाकार घेणे गरजेचे आहे कोणतं काम केलं कोणासाठी लढलं किती पारदर्शकता ठेवली? या प्रश्नाचे उत्तरे उमेदवारांनी जनतेसमोर ठेवणं सध्याच्या काळात गरजेचे झाले असल्याचे बोलले जात आहे.गुन्हेगारी पार्श्वभूमी, संपत्तीचा स्तोत्, शैक्षणिक पात्रता आणि सार्वजनिक जीवनातील कार्याची माहिती खुली करण्यावर देखील जोर दिला जात आहे. पक्षाने तिकिटे देताना केवळ मतंसंखेचा किंवा जा, पक्षीय समीकरणाचा विचार न करता समाजभान, कार्यक्षमता, महिलांचा सहभाग आणि तरुण नेतृत्व यांना प्राधान्य द्यावे अशी मागणी तालुक्यातील विविध क्षेत्रातील स्तरातून होत आहे मत मागायला दारापर्यंत येणारा नेता निवडून आल्यावर फोन सुद्धा उचलत नाही. मतापुरता मतदारांचा वापर करायचा आणि फेकून द्या याप्रमाणे मतदारांना दूर करतात असे होणारे चित्र बदलले पाहिजे अशी चर्चा आहे

# जेमिमाह रॉड्रिग्स : आत्मविश्वास, प्रतिभा आणि नव्या भारतातील स्त्रीशक्तीचं प्रतीक

जेमिमाह रॉड्रिग्स हे भारताच्या महिला क्रिकेट संघातील एक चमकदार आणि आशादायी खेळाडू आहे. ५ सप्टेंबर २००० ला मुंबई येथे जन्मलेल्या जेमिमाहने कमी वयातच क्रिकेटमध्ये आपली ओळख निर्माण केली आहे. भारतीय महिला क्रिकेटचा चेहरा बदलणाऱ्या नव्या पिढीत एक नाव तेजाने झळकतं ते जेमिमाह रॉड्रिग्स. तिच्या बॅटमधून निघणारा प्रत्येक चौकार केवळ धावसंख्या वाढवत नाही, तर तो प्रत्येक भारतीय मुलीच्या मनात उमटणाऱ्या "मीही करू शकते" या विश्वासाचा स्वर आहे.

मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात जन्मलेली मुंबईच्या भांडूप भागात वाढल्या, सामान्य कुटुंबातून आलेली जेमिमाहच्या कुटुंबाने नंतर बॅंड्रा वेस्टमध्ये स्थलांतर केले, कारण तिथे खेळासाठी उपयुक्त सुविधा अधिक होत्या. तिच्या वडिलांनी स्वतः शाळेत मुलींसाठी क्रिकेट टीम तयार केली. कारण त्यांना आपल्या मुलीला संधी हवी होती. हीच होती त्या लहानशा स्वप्नाची पहिली पायरी. मैदानावर बॅट हातात घेताना तिच्या डोळ्यांत धडाडी होती, पण चेहऱ्यावर नम्रता होती, हाच तिच्या व्यक्तिमत्त्वाचा गाभा. क्रिकेट व्यतिरिक्त तिला हॉकीमध्येही रुची होती आणि तिने महाराष्ट्रातील U17 हॉकी संघातही भाग घेतला होता. जेमिमाहने केवळ वयाच्या १७व्या वर्षी भारतासाठी पदार्पण केलं. त्या वयात जिथे अनेक जण अजून दिशा शोधत असतात, तिथे तिने देशाचं प्रतिनिधित्व केलं. तिच्या फलंदाजीमध्ये आक्रमकता आहे, पण त्याचवेळी ती तर्कशुद्ध आहे. तिचा टायमिंग, कव्हर ड्राइव्ह आणि स्मार्ट रोटेशन ऑफ स्ट्राइक हे आजच्या जागतिक दर्जाच्या महिला क्रिकेटमध्ये उदाहरण ठरत आहेत.

जेमिमाह ने २०१८ साली T20 आणि ODI कार्यक्षमतेत आंतरराष्ट्रीय पदार्पण केले. उजव्या हाताने फलंदाजी करणारी आणि अफ-ब्रेक गोलंदाजीही थोडी केली आहे. तिने अनेक उल्लेखनीय कामगिरी केल्या आहेत. उदाहरणार्थ २०१७ साली ५० ओव्हर खेळात महिला क्रिकेटमध्ये दुय्यम महिलेत दोनशे रन गाठणारी खेळाडू होती. तसेच २०१९ साली Women's T20 Challenge मध्ये त्यांनी 'सुपरनोव्हास' संघासाठी सर्वाधिक रन्स केल्या



आणि 'प्लेयर ऑफ द सीरीज' बनल्या. तिच्या कामगिरीमुळे भारतीय महिला क्रिकेटला नवीन ऊर्जा प्राप्त झाली आहे. तिची फलंदाजी केवळ धावा मिळवण्यापुरती नाही, तर संघाच्या विजयासाठी निर्णायक ठरतेय. जेमिमाह आपल्या कौशल्याने तसेच मैदानाबाहेरही एक प्रेरणा बनली आहे. ती तरुण खेळाडूंसाठी "मी ही करू शकतो" अशी भावना जागृत करते. मोठ्या दडपणाखाली खेळणे, सार्वजनिक अपेक्षा आणि झपाट्याने बदलणाऱ्या ग्लोबल क्रिकेट स्पर्धांमध्ये टिकणे. हे सर्व जेमिमाहसारख्या तरुण खेळाडूंसमोर मोठे आव्हान आहे. तथापि, त्यांच्या विकासाची गती आणि तिच्या कामगिरीतील सातत्य पाहता, भविष्यात अजून मोठी कामगिरी करण्याची क्षमता त्यांच्यात आहे.

पण हा प्रवास इतकाच गोड नव्हता. कधी संघातून बाहेर पडणं, कधी खराब फॉर्म, तर कधी सोशल मीडियावरील टीका, हे सर्व तिने सामोरं घेतलं. मात्र प्रत्येक वेळी ती परत आली अधिक परिपक्व, अधिक ठाम. भारतीय महिला क्रिकेट आता फक्त 'पुरुष क्रिकेटची सावली' राहिलेलं नाही. स्मृती मंधाना, हरमनप्रीत कौर, दीप्ती शर्मा, आणि जेमिमाह रॉड्रिग्स यांसारख्या खेळाडूंनी या क्षेत्राला नवसंजीवनी दिली आहे. जेमिमाह केवळ खेळत नाही, ती प्रतिनिधित्व करते. त्या सर्व मुलींचं, ज्यांनी समाजाच्या संकुचित चौकटी मोडून आपलं स्वप्न निवडलं. ती केवळ खेळाडू नाही, तर एक सच्ची प्रेरणा आहे. तिच्या हसण्यात आत्मविश्वास




आहे, आणि तिच्या वागण्यात साधेपणा. मैदानावर ती जशी झुंजते, तशीच ती जीवनातही आशावादाची झुंज देते. तिचे सोशल मीडियावरील संवाद, संगीताची आवड, आणि धर्मावरील विश्वास. हे सर्व तिच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचं दर्शन घडवतात.

काल तिचा एकेक चौकार तिला ट्रोल करणाऱ्या भक्तडुक्कर पिलावळीच्या सणसणीत मुस्काडात लगावल्यासारखा बसत होता. तिला जवळजवळ आयुष्यातून उठवण्याचा प्रयत्न केला होता हराम्यांनी. दुसऱ्याचं करीयर बरबाद होण्यात आनंद मानणं हे त्यांच्या पिढीजात नासक्या रक्तातच आहे. काही महिन्यांपूर्वी जेमिमाच्या वडिलांवर बेसलेस खोटे आरोप करून या पिलावळीनं तिचं खार जिमखाना सदस्यत्व रद्द करायला लावलं. 'ती ख्रिश्चन आहे' हा जणू तिचा दोष आहे, अशी वागणूक तिला दिली गेली. तिचं करियर संपवण्याचा घाट घातला. या नालायक जमातीच्या जिवघेण्या ट्रोलींगनं ती खचली. 'गँगरेप'सारख्या धमक्यांनी ती डिप्रेशनमध्ये गेली. तिनं क्रिकेट सोडण्याचा निर्णय घेतला. तिचे कुटूंबीय आणि कोच तिच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले. मानसोपचार तज्ञाची मदत घेऊन तिला पुन्हा उभं केलं. काल तिनं अक्षरश: डोळे दिपवणारा खेळ करून आपल्या देशाला वर्ल्डकप फायनलची जवळजवळ बंद झालेली दारं उघडी करून दिली ! सेमीफायनलला ३३८ धावांचा डोंगर पार करणं खायचं काम नव्हतं. जेमिमानं नाबाद शतक करून सात वेळच्या विश्वविजेत्या ऑस्ट्रेलियाला लांब फेकून दिलं... त्याचबरोबर भक्ताडांच्या ट्रोलिंगलाही सातासमूद्रापल्याड भिरकावून दिलं ! तिची ही खेळी पुरूष आणि स्त्रियांच्या वर्ल्ड कप नॉकआऊट फेरीमधली आजवरची रेकॉर्ड ब्रेक खेळी ठरली आहे. एवढंच नाही, तर जगभरातल्या महिला क्रिकेटसाठी ही ऐतिहासिक खेळी आहे.जेमिमाह हे केवळ एक उत्तम फलंदाज नाही, तर आधुनिक महिला क्रिकेटमध्ये बदल घडवू शकणाऱ्या व्यक्तिमत्वाचं प्रतीक आहेत. तसेच जेमिमाह ही केवळ एक क्रिकेटपटू नाही; तर ती नव्या भारतातील स्त्रीशक्तीचं जिवंत प्रतीक आहे. तिची कहाणी दाखवते की कसोटी, मेहनत, आणि आत्मविश्वास यांचं संगम कसा महान क्षात्रांसाठी मार्ग खुलवतो. पुढच्या काळात त्यांनी खेळाच्या प्रत्येक अंगावर आपली छाप सोडावी, अशी आशा बाळगावी. तिच्या बॅटमधून निघणाऱ्या प्रत्येक धावेसोबत भारतातील हजारो तरुणींना दिशा मिळते, आत्मविश्वास मिळतो, आणि समाजाला एक नवीन संदेश मिळतो."संधी दिली, तर मुलीही इतिहास घडवू शकतात."

जेमिमाह, आज संपुर्ण भारत देशाला आणि प्रत्येक खऱ्याखुऱ्या भारतीयाला तुझा अभिमान आहे. तू आमच्या देशाची शान आहेस. आमचा देश प्रत्येक देशवासियाच्या धर्माचा, जातीचा, पंथाचा, वंशाचा आदर करणारा आहे. संविधानानं दिलेली समता आणि बंधुता जपणारा आहे. धर्माचा आणि देशाचा ठेका घेऊन जबरदस्ती करू पहाणाऱ्या भिकारड्यांना तू आज खऱ्या अर्थानं दाखवून दिलंस की,"किसी के बाप का हिंदोस्तान थोडी ही है?"

**- प्रवीण बागडे**

# एक आरोग्य : मानव, प्राणी आणि पर्यावरणाच्या सुसंवादातून शाश्वत आरोग्याचा समाजशास्त्रीय मार्ग

०३ नोव्हेंबर हा दिवस दरवर्षी 'एक आरोग्य दिन' (One Health Day) म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे महत्त्व केवळ वैद्यकीय परिघात मर्यादित नाही, तर तो सामाजिक, पर्यावरणीय आणि नैतिक जबाबदारीचा जागरूक संदेश देतो. आजच्या जगात माणसाचे आरोग्य हे स्वतंत्रपणे समजून घेणे अशक्य झाले आहे. कारण मानव, प्राणी आणि पर्यावरण यांचे जीवन परस्परांशी घट्ट गुंतलेले आहे. 'एक आरोग्य' ही संकल्पना याच परस्परसंबंधाचा विचार करून सांगते की पृथ्वीवरील सर्व सजीव आणि त्यांच्या परिसरातील नातेसंबंध हे आरोग्याच्या मूळ गाभ्याशी निगडित आहेत. म्हणजेच मानवाचे आरोग्य प्राण्यांच्या आणि पर्यावरणाच्या आरोग्याशी अविभाज्य आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता ही संकल्पना केवळ वैद्यकीय नव्हे तर सामाजिक रचना, संस्कृती, अर्थव्यवस्था, पर्यावरणीय नीती आणि मानवी वर्तन यांचा समग्र आरसा बनते.

'एक आरोग्य' (One Health) ही संकल्पना जागतिक आरोग्य संघटना (WHO), जागतिक प्राणी आरोग्य संघटना (WOAH), संयुक्त राष्ट्रांची अन्न आणि कृषी संघटना (FAO) आणि संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (UNEP) यांनी संयुक्तपणे विकसित केली आहे. या तत्त्वानुसार मानव, प्राणी आणि पर्यावरण यांचे आरोग्य एकमेकांवर अवलंबून आहे, आणि कोणत्याही घटकातील असमतोल संपूर्ण जगाच्या आरोग्यसाखळीला धोक्यात आणतो. याचे अत्यंत ठळक उदाहरण म्हणजे 'कोविड-१९' महामारी, जी प्राण्यांकडून मानवाकडे पसरलेल्या झूनोटिक रोगाचे द्योतक ठरली. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार, सुमारे ६० टक्क्यांहून अधिक संसर्गजन्य रोग हे प्राण्यांकडून मानवाकडे पसरणारे म्हणजेच झूनोटिक रोग आहेत. समाजशास्त्रीय विश्लेषणात हे दिसते की या रोगांचा प्रसार केवळ जैविक कारणांमुळे नसून, मानवी वर्तन, पर्यावरणाचा नाश, जंगलतोड, औद्योगिकीकरण, शहरीकरण, आणि प्राण्यांच्या अधिवासात मानवी हस्तक्षेप यांमुळेही होतो.

आजच्या काळात आरोग्याच्या प्रश्नांकडे समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर अनेक परस्पर-संबंध उलगडतात. समाजशास्त्र सांगते की आरोग्य हे केवळ आजार नसण्याची स्थिती नाही, तर शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि पर्यावरणीय संतुलनाची अवस्था आहे. ही अवस्था समाजातील मूल्यव्यवस्था, आर्थिक परिस्थिती, शिक्षण, लिंगसमानता, सामाजिक न्याय आणि सांस्कृतिक आचारांवर अवलंबून असते. उदा. ग्रामीण भागात पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि पोषणाची कमतरता ही केवळ वैद्यकीय समस्या नसून ती सामाजिक असमानतेचे प्रतिबिंब आहे. त्याचप्रमाणे शहरी भागातील प्रदूषण, ध्वनीकल्लोळ, आणि मानसिक ताणतणाव हे आधुनिक जीवनपद्धतीचे उपउत्पादन आहेत. त्यामुळे 'एक आरोग्य'ची कल्पना समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आरोग्याला सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारीच्या




चौकटीत बसवते.

भारतीय परंपरेतही 'एक आरोग्य'सदृश विचारांचे दर्शन होते. प्राचीन ग्रंथांमध्येही मानव आणि निसर्गाच्या सुसंवादाला सर्वोच्च स्थान दिले गेले आहे. मानवाचे आरोग्य आणि विश्वाचे संतुलन एकसंध मानले गेले आहे. "वसुधैव कुटुंबकम्" ही संकल्पना पृथ्वीवरील सर्व सजीव एकाच कुटुंबाचे घटक असल्याचा संदेश देते. परंतु औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि तंत्रज्ञानाच्या अतिरेकामुळे मानवाने निसर्गाच्या सहजीवनाची ही मूल्यव्यवस्था विसरली आहे. परिणामतः पर्यावरणीय ऱ्हास, जलवायू बदल, हवामानातील अस्थिरता, अन्नसाखळीतील विषारी रासायनिक हस्तक्षेप, तसेच प्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासाचा नाश या सर्वांनी मानवाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम केला आहे.

'एक आरोग्य' दृष्टीकोन समाजात शाश्वत आणि न्याय्य आरोग्यव्यवस्था निर्माण करण्याचे ध्येय ठेवतो. तो आरोग्याचा प्रश्न केवळ डॉक्टर-रुग्ण संबंधात मर्यादित न ठेवता, शासन, शिक्षण, पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि नागरिक जबाबदारी या सर्व क्षेत्रांत पसरवतो. समाजशास्त्रज्ञांच्या मतानुसार आरोग्यविषयक असमानता ही सामाजिक विषमतेशी थेट संबंधित आहे. गरीब, महिला, आदिवासी, स्थलांतरित मजूर आणि ग्रामीण समाजातील दुर्बल घटक हे आरोग्य संकटांचे सर्वाधिक बळी ठरतात. त्यांना स्वच्छ पाणी, पोषण, आणि आरोग्यसेवा मिळविण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक अडथळयांचा सामना करावा लागतो. त्यामुळे 'एक आरोग्य' ही संकल्पना सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाची ठरते.

पर्यावरणीय असंतुलन हा आरोग्याचा सर्वात मोठा सामाजिक धोका बनला आहे. वृक्षतोड, प्लास्टिक संस्कृती, रासायनिक शेती, प्रदूषण आणि औद्योगिक कचरा यांमुळे माती, पाणी आणि हवा दूषित झाली आहे. या प्रदूषणामुळे श्वसनाचे विकार, त्वचारोग, कर्करोग, अन्नातील विषारी घटक, तसेच मानसिक आरोग्यावर परिणाम करणारे घटक वाढले आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोन सांगतो की हे केवळ पर्यावरणीय नव्हे तर आर्थिक आणि नैतिक प्रश्न आहेत, कारण या परिस्थितीचा सर्वाधिक फटका दुर्बल वर्गांना बसतो. 'एक आरोग्य' या दृष्टीकोनातून समाजाला पर्यावरणीय न्यायाची नवी संकल्पना मिळते, जिथे प्रत्येक व्यक्तीला निरोगी वातावरणात जगण्याचा अधिकार मिळतो.

ग्रामीण भारतात अजूनही आरोग्य आणि पशुवैद्यकीय सेवा वेगळ्या पातळीवर कार्य करतात. परंतु 'एक आरोग्य' संकल्पनेनुसार मानव, प्राणी आणि पर्यावरण या तिन्ही घटकांचे आरोग्य एकत्रित विचारात घेतल्याशिवाय झूनोटिक रोगांना रोखता येणार नाही. उदा. दुधाळ प्राण्यांचे लसीकरण, कचरा व्यवस्थापन, पिण्याच्या पाण्याचे परीक्षण, शेतीतील रासायनिक वापर यांचे एकत्रित नियोजन केल्यास मानव आणि प्राण्यांच्या आरोग्यावर होणारा नकारात्मक परिणाम कमी होऊ शकतो. यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्य विभाग, पशुवैद्यक तज्ञ, पर्यावरणतज्ज्ञ आणि समाजकार्यकर्ते यांचे एकात्मिक सहकार्य आवश्यक आहे.

'एक आरोग्य'चा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे मानसिक आरोग्य. आधुनिक जीवनशैली, प्रदूषण, नोकरीतील अस्थिरता, सामाजिक एकाकीपण आणि नैसर्गिक संसाधनांपासून तुटलेला मानवी संबंध हे सर्व मानसिक असंतुलनाचे कारण बनले आहे. संशोधन दर्शविते की निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या समाजांमध्ये मानसिक आरोग्य अधिक संतुलित असते. त्यामुळे समाजशास्त्रीय पातळीवर मानसिक आरोग्याचे आणि पर्यावरणाशी असलेल्या नात्याचे पुनर्संयोजन करणे आवश्यक आहे.

'एक आरोग्य दिन' आपल्याला शाश्वत विकास उद्दिष्टांची आठवण करून देतो. संयुक्त राष्ट्रांच्या २०३० टिकाऊ विकास कार्यक्रमात "आरोग्य आणि कल्याण", "स्वच्छ पाणी आणि स्वच्छता", "हवामान कृती", आणि "जमिनीवरील जीवन" ही उद्दिष्टे 'एक आरोग्य'च्या तत्त्वांशी थेट जोडलेली आहेत. हे केवळ जागतिक ध्येय नसून प्रत्येक देश, राज्य, आणि गावाच्या स्तरावर अंमलात आणण्याजोगे मार्गदर्शक तत्त्व आहे. शालेय शिक्षणापासून ते आरोग्यसेवा, कृषी आणि उद्योग क्षेत्रापर्यंत या संकल्पनेचे सामाजिक आकलन झाल्यास 'आरोग्यपूर्ण समाज' निर्माण होऊ शकतो.समाजशास्त्रीय विश्लेषणात 'एक आरोग्य' ही संकल्पना मानवाच्या वर्तनातील बदलाचे आवाहन करते. ती सांगते की आरोग्याचा प्रश्न फक्त वैयक्तिक जबाबदारीचा नाही, तर सामाजिक एकत्रिकतेचा आहे. आपल्या आहाराच्या सवयी, उपभोग संस्कृती, कचरा व्यवस्थापन, जलस्रोतांचे संरक्षण, जैवविविधतेचे जतन आणि प्राण्यांविषयी संवेदनशीलता या सर्व गोष्टी समाजाच्या आरोग्यदृष्टीला आकार देतात. म्हणूनच 'एक आरोग्य' ही एक चळवळ बनली पाहिजे, जी व्यक्तीच्या आरोग्यापलीकडे जाऊन पृथ्वीच्या आरोग्याचे संरक्षण करेल.

शेवटी, 'एक आरोग्य दिन' हा मानवतेच्या परस्परसंबंधांचा सण आहे. तो आपल्याला स्मरण करून देतो की माणूस निसर्गापासून वेगळा नाही. पृथ्वी, प्राणी, वनस्पती, हवा, पाणी आणि मानव हे सर्व एकाच जीवनसाखळीचे घटक आहेत. या साखळीतील कोणताही घटक दुर्लक्षित झाला, तर संपूर्ण आरोग्यव्यवस्था असंतुलित होते. त्यामुळे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आरोग्याचा विचार करताना समता, न्याय, सहजीवन आणि पर्यावरणीय जबाबदारी हे मूलभूत तत्त्व ठरतात. 'एक आरोग्य' म्हणजे आरोग्याचा सर्वसमावेशक लोकशाही मार्ग होय. जिथे विज्ञान, समाज, निसर्ग आणि मानवता एकत्र येऊन शाश्वत जग निर्माण करतात. ०३ नोव्हेंबरचा 'एक आरोग्य दिन' साजरा करणे म्हणजे केवळ आरोग्याचा दिवस पाळणे नव्हे, तर मानवाने आपल्या जीवनशैलीचा पुनर्विचार करण्याचा दिवस आहे. आपले आरोग्य, प्राण्यांचे आरोग्य आणि पर्यावरणाचे आरोग्य हे तिन्ही एका सूत्रात बांधलेले आहेत, या जाणिवेनेच खऱ्या अर्थाने "एक आरोग्य" साकार होईल. कारण शेवटी, मानवाचे आरोग्य पृथ्वीच्या आरोग्यापासून वेगळे नाही; ते दोन्ही एकाच अस्तित्वाच्या दोन बाजू आहेत.

**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

# मालवणी संस्कृतीचा अग्रदूत



नुकताच 'दशावतार' हा चित्रपट गाजला. याच दशावतारावर आधारित आणि त्यातल्या गमतीजमतींवर बेतलेले मालवणी बोलीतले 'वस्त्रहरण' हे नाटककार गंगाराम गवाणकर यांचे नाटक १९७५ सालापासून आजतागायत हाऊसफुल्ल गर्दीत जवळजवळ साडेपाच हजार प्रयोगांचा पल्ला गाठून भरधाव वेगाने सुरूच आहे. या वाटचालीत त्याने अनेकानेक विक्रम प्रस्थापित केले आहेत.

गंगाराम गवाणकर हे जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समध्ये शिकत असतानाच त्यांनी लिहिलेल्या 'आज काय नाटक होवचा नाय' या एकांकिकेपासून सुरू झालेल्या 'वस्त्रहरण'च्या प्रवासाने सुरुवातीस अनेक टक्केटोणपे खात पुढे थेट लंडनवारी गाजवण्यापर्यंत घोडदौड केली. सुरुवातीला हे नाटक अपयशी ठरले होते. याचे कारण यातली 'नाटकातले नाटक' ही संकल्पनाच ते करणाऱ्यांना नीटशी कळली नव्हती. पण मिच्छद्र कांबळी यांना या नाटकाबद्दल इतका आत्मविश्वास होता, की ते एक ना एक दिवस यशस्वी होणारच ही त्यांना शंभर टक्के खात्री होती. त्यामुळे ते यशस्वी होईपर्यंत त्यांनी 'वस्त्रहरण'चा पिच्छाच पुरवला आणि या नाटकाने पुढे खरोखरीच इतिहास घडवला.

'वस्त्रहरण'ची गंमत म्हणजे त्याच्या पहिल्या प्रयोगात मिच्छद्र कांबळी नव्हते. ज्या दिवशी शुभारंभाचा प्रयोग होणार होता त्या दिवशी सूर्यग्रहण होणार असल्याचे लक्षात आले. आणि ते अशुभ असल्याने ठरलेल्या तारखेच्या आदल्या दिवशी नाटकाचा शुभारंभ करायचे ठरले. पण त्या दिवशी मिच्छद्र कांबळी यांच्या 'महासागर' नाटकाचा पुण्यात प्रयोग होता. त्यामुळे ते या प्रयोगात उपलब्ध नव्हते. मग तोडगा असा काढण्यात आला की, स्वत: लेखक गंगाराम गवाणकरांनीच पहिल्या प्रयोगात तात्या सरपंचांची भूमिका करायची. त्याप्रमाणे ते प्रयोगात उभे राहिले आणि शुभारंभाचा प्रयोग पार पडला. आणि नंतर मिच्छद्र कांबळी 'वस्त्रहरण'चा भाग झाले. नाटक लोकांना आवडत होते, परंतु म्हणावे तसे बुकिंग त्याला होत नव्हते. शेवटी पुण्यात प्रयोग करून हे नाटक थांबवायचे असे ठरले. आणि नेमके त्या प्रयोगाला पु. ल. देशपांडे, वसंतराव देशपांडे, सुनीताबाई देशपांडे आले होते. महाराष्ट्राला आपल्या निखळ विनोदाने हसवणाऱ्या पुलंसमोर नाटकाचा प्रयोग करायचा याचे दडपण साहजिकच सर्वांवर आले होते. परंतु हा प्रयोग इतका रंगला की पुलंनी रंगपटात येऊन गवाणकरांसह सगळ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. नंतर गवाणकरांना एक खुशीपत्र लिहून भरभरून लेखी पोचपावतीही दिली.

पु. ल. देशपांडे यांनी 'हे नाटक पाहून हसता हसता जे जे अवयव दुखू शकतात ते दुखताहेत. मला हे नाटक बघण्यापेक्षा यात छोटीशी भूमिका करायला मिळाली असती तर अधिक बहार आली असती!' या आशयाचे उद्गार काढत 'मराठी रंगभूमीवरचा अस्सल देशी फार्स' अशी 'वस्त्रहरण'वर स्तुतीसुमने उधळली होती. आणि मग काय, बुकिंगअभावी बंद पडता पडता 'वस्त्रहरण' अक्षरश: उसळले आणि धो-धो धावायला लागले. 'वस्त्रहरण'ने केवळ मालवणी नाटकांचीच रंगभूमीवर लाट आणली नाही, तर मालवणी खाद्यसंस्कृतीही त्याने महाराष्ट्रभर रुजवली. इतकी, की पंचतारांकित हॉटेलांतही मालवणी सागुती वडे जाऊन विराजमान झाले. 'मालवणी याड' म्हणून तोवर हिणवल्या जाणाऱ्या मालवणी माणसाची मानही 'वस्त्रहरण'ने ताठ केली. आणि याचे कर्तेधर्ते होते सर्वस्वी गंगाराम गवाणकर आणि मिच्छद्र कांबळी. तोवर अनेक नाटकांतून किरकोळ भूमिका करणाऱ्या मिच्छद्र कांबळी यांची मालवणी नाटकांचा अनभिषिक्त सम्राट अशी नाममुद्रा 'वस्त्रहरण'ने मराठी रंगभूमीवर उमटविली. त्यातूनच त्यांनी आपली 'भद्रकाली प्रॉडक्शन' ही निर्मिती संस्था सुरू केली. त्यांची ही लोकप्रियता एवढी कळसाला पोहोचली होती की त्यांनी लोकसभेची निवडणूकही लढवली. एखादी बोलीभाषा मराठी रंगभूमीवर रुजवण्याचे मोठे काम 'वस्त्रहरण'ने केले. इतका भलाथोरला इतिहास मालवणी 'वस्त्रहरण'ने घडवला होता. मात्र गंगाराम गवाणकरांनी पुढच्या काळात 'वडाची साल पिपळाक' हे एकमेव नाटक वगळता मालवणी नाटकांचे दळण कायम दळले नाही. त्यानंतर 'चाकरमानी', 'केला तुका झाला माका', 'येवा कोकण आपलाच आसा', 'पांडगो इलो रे बा इलो'सारख्या मालवणी नाटकांची एकच लाट आली; पण ती इतर लेखकांची होती. महाराष्ट्रातील एका बोलीतील नाटकांची अशी लाट यापूर्वी कधीच आली नव्हती. पुढच्या काळात महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागांतील कलाकार मुंबईत आले आणि त्यांनी नाटक, सिनेमा, सीरियल्समधून आपापल्या बोलींना काहीएक स्थान मिळवून दिले, त्यांची गोडी शहरी रसिकांना लावली, हा अगदी अलीकडचा इतिहास झाला.

राजापूर तालुक्यातील माडबन या गावातून अत्यंत खडतर परिस्थितीत शालेय शिक्षणासाठी मुंबईत आलेले किशोरवयीन गंगाराम गवाणकर फूटपाथवर राहून, स्मशानात अभ्यास करून, जगण्यासाठी बारीकसारीक नोकऱ्या करत सुरुवातीच्या काळात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जगण्याशी संघर्ष करत होते.

कोकणी मातीचे आणि तिथल्या नाटकांचे संस्कार बालपणीच झाल्यामुळे सतत नाटकाचा किडा त्यांच्या डोक्यात वळवळत असे. त्यातूनच पुढे ते नाट्यलेखनाकडे वळले. आणि ज्या मुंबई विमानतळावर बालमजूर म्हणून त्यांनी काम केले होते, त्याच विमानतळावरून त्यांनी 'वस्त्रहरण' घेऊन लंडनला झेप घेतली होती. परंतु ते 'वस्त्रहरण'च्या यशात मग्न राहिले नाहीत. त्यांनी 'वन रूम किचन' आणि 'वात्रट मेल''सारखी हजार, अडीच हजार प्रयोगसंख्येची नाटकेही रंगभूमीला दिली. त्यांनी १६-१७ नाटके लिहिली. आपले कनिष्ठ मध्यमवर्गीय जगणे, त्यातले तिढे, पेच, त्यातला संघर्ष हेच त्यांनी मुख्यत्वेकरून आपल्या नाटकांचे विषय बनवले. पण त्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन मात्र तक्रारीचा न राहता मिश्किल, विनोदी राहिला. 'वन रूम किचन' हे खरं तर त्यांची स्वत:चीच मुंबईत घर घेताना झालेली असह्य फरफट चित्रीत करणारे नाटक आहे. 'वात्रट मेले' हेही त्यांना भेटलेल्या चिवित्र माणसांवरचे नाटक आहे. त्यांचे आयुष्य इतक्या चित्रविचित्र वळणांनी घडलेले होते आणि त्यांना इतक्या भिन्न भिन्न वृत्ती-प्रवृत्तींची माणसे आजवर भेटली होती, की त्यांना त्यांनी आपल्या विलक्षण निरीक्षणशक्तीद्वारे टिपकागदासारखे टिपले होते. त्यामुळे त्यांना लेखनासाठी वेगळ्याने विषय शोधावे लागले नाहीत.

आपल्याला आयुष्यात यश कधीच सहजासहजी मिळाले नाही, तर त्यासाठी आपल्याला खूप कष्ट करावे लागले आणि तसेच कष्ट व हालअपेष्टा सोसत आपली नाटकेही तरली, यशस्वी झाली असे ते म्हणत. त्यांचे 'व्हाया वस्त्रहरण' हे आत्मकथन राम नगरकरांच्या 'रामनगरी' या विक्रमी आत्मकथनासारखेच हलकेफुलके, खुसखुशीतपणे उतरले आहे. त्यांना चार्ली चॅप्लिनवरही नाटक लिहायचे होते. परंतु त्यांचा हा संकल्प मात्र अधुराच राहिला. त्यांनी रवींद्रनाथ टागोरांच्या कथेवर आधारीत 'चित्रांगदा' हे नृत्यनाट्यही लिहिले. आपल्या महाराष्ट्रात अनेक बोलीभाषा आहेत. त्यांतील नाटकेदेखील रंगभूमीवर यायला हवीत, त्यांचा आस्वाद रसिकांना घेता यायला हवा असे गंगाराम गवाणकर यांना वाटत होते. त्यातूनच बोलीभाषेतील एकांकिकांची कल्पना पुढे आली. त्यांनी आपली ही कल्पना निर्माते गोविद चव्हाण यांना सांगितली आणि त्यांनी ती उचलून धरली.

आज ही बोलीभाषेतील एकांकिकांची स्पर्धा चांगलीच मूळ धरून आहे. त्यातून निरनिराळ्या मातीतले लेखक आपल्या बोलीभाषा घेऊन पुढे येत आहेत. गवाणकरांनी अनेक वृत्तपत्रांतून स्तंभलेखनही केले. त्यांच्या आजवरच्या लेखन कारकीर्दीचा गौरव करणारे नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद त्यांना लाभले. अलीकडच्या काळात ते आपल्या माडबन या गावी येऊन जाऊन असत. त्यांची लेखनऊर्मी अजूनही ताजी, तरुण होती. त्यांच्या भेटीत लेखनाचे अनेक संकल्प त्यांच्या बोलण्यात येत. मात्र आता अचानक त्यांची लेखणी वयोमानानुरूप कायमस्वरूपी थबकली आहे. त्यांना भावपूर्ण आदरांजली.

# 'अ परफेक्ट मर्डर' नाटकातून हिचकॉकचा जिवंत थ्रिल मराठी रंगभूमीवर




"हिचकॉक म्हणजे थ्रिलचा राजा. त्यांच्या कलाकृतींमध्ये असलेला गूढपणा, रोमांच आणि भीतीचा सूक्ष्म खेळ नेहमीच मला मोहवतो," असं अभिनेत्री दिप्ती भागवत सांगतात. त्या लवकरच रंगभूमीवर "अ परफेक्ट मर्डर" या नाटकातून मीरा ही मध्यवर्ती भूमिका साकारणार आहेत आणि ही भूमिका प्रेक्षकांना रहस्याच्या नव्या जगात घेऊन जाणार आहे.

हे नाटक सुप्रसिद्ध चित्रपटकार सर अल्फ्रेड हिचकॉक यांच्या क्लासिक कथानकावर आधारित असून लेखक नीरज शिरवईकर आणि दिग्दर्शक विजय केंकरे यांनी त्याला मराठी रंगभूमीचा साज चढवला आहे. "मूळ कथेचा आत्मा कायम ठेवून, मराठी संवेदनांना साजेसं रूपांतर करणं ही मोठी कसोटी होती आणि आमच्या टीमने ती उत्कृष्टरीत्या पार पाडली," असं दिप्ती म्हणतात.

दिप्तीची 'मीरा' ही एक बहुरंगी व्यक्तिरेखा आहे श्रीमंती, सौंदर्य आणि आत्मविश्वासाने झगमगणारी, पण अंतर्मनात असंख्य प्रश्न आणि भावनांच्या वादळांनी ढवळलेली. "ती दोषी आहे की बळी हे समजून घेणंही नाटकाचा भाग आहे," असं दिप्ती गूढ स्मितासह सांगतात.

या भूमिकेसाठी त्यांना भावनिक खोली आणि संयम दोन्हीची गरज भासली. "प्रत्येक दृश्य हे प्रेक्षकांशी संवाद साधणारं आहे. काही संवाद शब्दात नाहीत, ते नजरेत आहेत नाटकातील प्रत्येक थांबा, प्रत्येक शांतता काहीतरी सांगून जाते," असं त्या सांगतात.

दिग्दर्शक विजय केंकरे यांच्यासोबतचा अनुभव त्या "शिकण्याचा प्रवास" म्हणतात. "प्रत्येक तालमीत विजय सरांनी पात्राची नवी बाजू दाखवली. त्यामुळे 'मीरा'ला खऱ्या अर्थाने मी आतून जगू शकले."

बदाम राजा प्रोडक्शनसह, अनिकेत विश्वासराव, श्वेता पेंडसे, राहुल पेठे, सुबोध पंडे आणि पुष्कर श्रोत्री या सहकलाकारांसोबत काम करणं 'सहज आणि प्रेरणादायी' असल्याचं त्या सांगतात.

"अ परफेक्ट मर्डर हा फक्त रहस्य नाटक नाही तो एक भावनांचा आणि सस्पेन्सचा सजीव खेळ आहे. तो रंगमंचावर अनुभवताना प्रेक्षक श्वास रोखून बसतील," असा विश्वास दिप्ती व्यक्त करतात.

विशेष म्हणजे रॉयल ऑपेरा हाऊस हे एक आयकॉनिक थिएटर आहे, जिथे मराठी नाटकांचे प्रयोग फार कमी होतात.

प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्याने ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७.०० वाजता रॉयल ऑपेरा हाऊसला 'अ परफेक्ट मर्डर'चा ६ वा प्रयोग आयोजित केला आहे. थ्रिल, नात्यांचा गुंता आणि अभिनयाचा उत्कट संगम 'अ परफेक्ट मर्डर" हे नाटक मराठी रंगभूमीवर एक संस्मरणीय अनुभव ठरणार आहे.

# महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम श्रमेश बेटकर म्हणतोय, लास्ट स्टॉप खांदा



सध्या जोरदार चर्चेत असलेल्या 'लास्ट स्टॉप खांदा…' या चित्रपटाचं टायटल साँग लाँच करण्यात आलं आहे. प्रत्येकाला थिरकायला लावणारं हे गाणं असून, दोन दमदार गाण्यांनी चित्रपटाविषयीची उत्सुकता वाढवली आहे. २१ नोव्हेंबरला हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार आहे. शिवम फिल्म क्रिएशन सिग्नेचर ट्यून्स, स्नेहा प्रॉडक्शन्स यांनी "लास्ट स्टॉप खांदा… " प्रत्येकाच्या प्रेमाची गोष्ट या चित्रपटाची निर्मिती केली आहे. सचिन कदम आणि सचिन जाधव यांनी या चित्रपटाती प्रस्तुती केली आहे. प्रदीप मनोहर जाधव हे या चित्रपटाचे निर्माते असून सचिन कदम, अमृता सचिन जाधव सहनिर्माते आहेत.

प्रत्येकाच्या प्रेमाची गोष्ट लास्ट स्टॉप खांदा या चित्रपटातून पहायला मिळणार आहे. या चित्रपटातलं 'शालू झोका दे गो मैना' हे गाणं या पूर्वीच लोकप्रिय झालं आहे. त्याशिवाय चित्रपटाच्या टीजरला सोशल मीडियातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. त्यानंतर आता चित्रपटाचं टायटल साँग लाँच करण्यात आलं आहे. या गाण्याला अतिशय साधेसोपे शब्द, उडती चाल, प्रत्येकाला थिरकायला लावणाऱ्या ठेक्याची जोड मिळाली आहे. श्रेयस राज आंगणे याने लिहिलेल्या या टायटल सॉंगला सुहास सावंत यांचा स्वरसाज लाभला असून संगीत श्रेयस राज आंगणे यांचे आहे, तर नृत्यदिग्दर्शन राहुल बनसोडे, रवी आखाडे यांचे आहे.श्रमेश बेटकर लिखित या चित्रपटाचं दिग्दर्शन विनीत परुळेकर यांनी केलं आहे. चित्रपटात अभिनेता श्रमेश बेटकर अभिनेत्री जुईली टेमकर, निखिल बने, मंदार मांडवकर, शशिकांत केरकर, सुदेश जाधव, महेश करपेकर, प्रियांका हांडे, डॉ. सचिन वामनराव, गणेश गुरव, निशांत जाधव, गिरीश तेंडुलकर, जयश्री गोविंद अशी तगडी स्टारकास्ट आहे. तर पाहुणे कलाकार म्हणून प्रभाकर मोरे, धनश्री काडगावकर, अशोक ढगे हे आपल्या भेटीस येणार आहेत. चित्रपटाचं छायांकन हरेश सावंत यांचं असून कलादिग्दर्शक केशव ठाकुर आहेत. मनोरंजक कथानक, उत्तम अभिनेते असलेल्या या चित्रपटाविषयीची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे. हा चित्रपट २१ नोव्हेंबरपासून चित्रपटगृहात पाहता येणार आहे.




**मेष** – खर्चाचे योग्य नियोजन करावे लागेल. मानसिक स्वास्थ्य जपावे. आपली छाप पाडण्यात यशस्वी व्हाल. आपली प्रतिष्ठा जपावी.

**वृषभ** – महत्त्वाचे काम करून घ्या. घरातील व्यक्तीची काळजी वाटेल. सहकाऱ्यांशी जुळवून घ्यावे लागेल. कामाचे योग्य नियोजन करावे.

**मिथुन** – अपेक्षित व्यक्तीची भेट होईल. मैत्री वाढेल. धंद्यात फायदा होईल. कला-क्रीडा स्पर्धेत चमकाल. मानापमानात अडकून पडू नका.

**कर्क** – संसारात कामाचा व्याप वाढेल. नम्र राहा. मौल्यवान खरेदी केली जाईल. कष्टाला मागे पुढे पाहू नका. उतावळेपणा करू नका.

**सिंह** – काही अनपेक्षित बदल दिसून येतील. मित्रमंडळींशी सलोखा ठेवावा लागेल. जुन्या प्रकरणातून त्रास संभवतो. प्रवासात सावध राहा.

**कन्या** – आज ठरवलेले काम उद्यावर टाकू नका. गैरसमजातून वाद वाढू देऊ नका. कोर्ट कचेरीचा प्रश्न सोडवू शकाल. नवा विषय शिकाल.

**तूळ** – अचानक आपला कार्यक्रम बदलावा लागेल. आपणास सामाजिक प्रतिष्ठा लाभेल. कोर्ट कचेरीची कामे त्रासदायक ठरू शकतात.

**वृश्चिक** – आजचे काम वेळेत पूर्ण करता येईल. जोडीदाराच्या आरोग्याची काळजी घ्यावी. स्पर्धेत जिंकाल. आपले मन शांत ठेवा.

**धनु** – आपण स्पर्धेत प्रगती कराल. नवीन ओळख होईल. तुमचा विचार इतरांना पटणे कठीण आहे. मित्रांशी गप्पांमध्ये वेळ घालवाल.

**मकर** – आपणास अडचणीतून मार्ग काढता येईल. स्वत:ची कामे स्वत: करा. धंद्यात आळस करू नका. एखादी पैज जिंकता येईल.

**कुंभ** – धंद्यात मोठे काम मिळेल. प्रतिष्ठा वाढेल. विरोधकांच्या कारवायांवर लक्ष ठेवा. नोकरीत फायदा होईल. नवीन गोष्टी आवडीने शिकाल.

**मीन** – कुटुंबात महत्त्वाची घटना घडेल. वाटाघाटीत यश मिळेल. व्यवसायात नवा विचार करता येईल.

# प्रोटीनने समृद्ध असतात हे शाकाहारी पदार्थ; तज्ज्ञांनीच सांगितले फायदे

फिट अँड फाईन राहण्यासाठी आहारात प्रोटीनयुक्त पदार्थांचा समावेश करणं गरजेचं आहे. बऱ्याचदा असा समज होतो की प्रोटीन हे किवळ मांसाहारी पदार्थांत जास्त प्रमाणात असतं. मात्र काही शाकाहारी पदार्थ हे प्रोटीनने समृद्ध असतात. हे पदार्थ तुमच्या आहारात समाविष्ट केल्याने अनेक फायदे होतात.


**डाळ, कडधान्य**

डाळ आणि कडधान्य हे प्रथिने, तसेच फायबर आणि आवश्यक खनिजांचे चांगले स्रोत मानले जातात. पिवळ्या आणि हिरव्या डाळींमधून शरीराला साधारण ९ – १० ग्रॅमपर्यंत प्रोटीन मिळते. तुमच्या दैनंदिन आहारात हे पदार्थ समाविष्ट केल्यास शरीराला फायदा होतो.

**शेंगदाणे**

शेंगदाणे प्रथिनांनी समृद्ध असतात आणि ते व्हिटॅमिन आणि खनिजांचा चांगला स्रोत आहेत.

**ड्रायफ्रुट्स आणि बिया**



बदाम, अक्रोड, भोपळ्याच्या बिया, आणि चिया सीड्स यांसारख्या बिया आणि ड्रायफ्रुट्स खाल्ल्याने प्रथिनांची कमतरता भरून निघू शकते.

**टोफू किंवा सोयाबीन**

सोयाबीनमध्ये नऊ अमीनो आम्ले असतात. तर १०० ग्रॅम टोफूमध्ये सुमारे १० ग्रॅम प्रथिने असतात. सोयाबीनमध्ये फायबर आणि अनेक जीवनसत्त्वे जास्त प्रमाणात असतात, तर टोफूमध्ये कॅल्शियम आणि प्रथिने असतात. त्यामुळे आहारात या पदार्थांचा समावेश केल्यास स्नायूंच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरते.

**कॉटेज चीज आणि ग्रीक दही**

१०० ग्रॅम कॉटेज चीजमध्ये सुमारे १८ ग्रॅम प्रथिने असतात, तर १०० ग्रॅम ग्रीक दह्यात सुमारे १० ग्रॅम प्रथिने असतात. मात्र कॉटेज चीजमध्ये चरबीचे प्रमाण जास्त असते त्यामुळे मर्यादित प्रमाणात ते खाणं चांगलं असतं. तसेच दूध, दही आणि पनीरमध्ये भरपूर प्रमाणात प्रोटीन आढळते. आपल्या शरीरातील प्रोटीनची कमतरता भरून काढण्यासाठी केवळ मांसाहारी पदार्थांची गरज नाही तर तुम्ही आपल्या आहारामध्ये दुधाचे, दह्याचे आणि पनीरचे अनेक पदार्थ समाविष्ट करून घेऊ शकता.

**क्विनोआ**

क्विनोआ हे एक प्रकारचे धान्य आहे. जे दक्षिण अमेरिकेतून भारतामध्ये आले आहे. हे स्वादिष्ट असण्यासोबतच अतिशय पौष्टिक देखील आहे. क्विनोआमध्ये प्रथिने आणि फायबर दोन्ही भरपूर प्रमाणात असतात. रोटी, उपमा, पोहे, कोशिंबीर इत्यादी स्वरूपात याचा आहारात समावेश केला जाऊ शकतो.

## थोडक्यात

### लॅपटॉप आणि मोबाईलची चोरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

अनोळखी इसमाने घरात प्रवेश करून लॅपटॉप आणि मोबाईलची चोरी केल्याप्रकरणी 30 ऑक्टोबर रोजी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.ओमकार मर्चंडे हे सेक्टर 10, कामोठे येथे राहत असून ते घरामध्ये झोपले होते. सकाळी आईने उठवले यावेळी त्यांनी मोबाईल पाहिला असता मोबाईल सापडला नाही. तसेच लॅपटॉप देखील दिसून आला नाही. अनोळखी इसमाने ते चोरून नेले. तसेच 30 ऑक्टोबर रोजी आईच्या ॲक्सिस बँकेचे अकाउंट चेक केले असता अकाउंट मधून पाच हजार रुपये दुसऱ्या अकाउंटला ट्रान्सफर झाल्याचे दिसून आले.

### दाढी करण्याच्या वस्तऱ्याने केले वार

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

दाढी करण्याच्या वस्तऱ्याने उजव्या डोळ्याच्या खाली गालावर वार करून जखमी केल्याप्रकरणी आरोपी सीठासिंग रघुवीर सिंग (राहणार देवद) याच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात 29 ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.रवींद्र वाघमारे हे पंचशील नगर, नवीन पनवेल येथे राहत असून ते 25 ऑक्टोबर रोजी सलूनच्या दुकानात केस कापण्यासाठी गेले. यावेळी समोरील कामगाराने प्रथम पैसे दे मग केस कापतो असे सांगितले. यावेळी मालक कुठे आहे असे विचारले असता त्याने शिवीगाळ केली आणि दुकानातील वस्तरा घेऊन डोळ्याच्या खाली ओठापर्यंत वस्तऱ्याने वार करून जखमी केले. आणि त्यानंतर सीठासिंग हा तेथून पळून गेला.

### 50 लाख 17 हजारांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

स्टॉक मार्केटिंग बाबत माहिती देणार असून त्यात ट्रेडिंग करण्यास सांगून पन्नास लाख 17 हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी प्रगती बगाडिया या महिलेविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विश्वजीत बसक हे खारघर, सेक्टर 4 येथे राहत असून त्यांना प्रगती नामक महिलेकडून स्टॉक मार्केटिंग बाबत माहिती देणार असल्याचा मेसेज आला. यावेळी ते व्हाट्सअप वर बोलू लागले. त्यांना लिंक पाठवून फॉर्म भरण्यास सांगितला. त्यानंतर एक ॲप डाऊनलोड करण्यास सांगितला. यावेळी खात्यामध्ये दहा हजार रुपये पाठवले. त्यानंतर 50 लाख रुपये इन्वेस्ट करा आणि रकमेच्या 20 टक्के नफा मिळेल असे सांगितल्याने त्यांनी पैसे पाठवले. त्यांना 86 लाख रुपये नफा दाखवला. पैसे काढण्यास गेले असता पैसे काढता येणार नाहीत आणखी 50 लाख रुपये इन्वेस्ट करा मग पैसे येतील असे सांगितल्यानंतर त्यांना फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

### पोलीस असल्याची बतावणी, चैन आणि अंगठी घेऊन दोघे पसार

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पोलीस असल्याची बतावणी करत 80 वर्षीय इसमाकडील सोन्याची चैन आणि अंगठी घेऊन दोघेजण मोटरसायकल वरून पसार झाले. या प्रकरणी 28 ऑक्टोबर रोजी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.गोविंदं प्रभाकरन हे सेक्टर 20 खारघर येथे राहत असून ते ग्रामविकास भवन, खारघर जवळील भाजीपाल्याच्या बाजारातून भाजी घेऊन घरी रेन ट्री मार्गाने पायी चालत जात होते. त्यावेळी एक इसम त्यांचे समोर आला आणि सीआयडी पोलीस असल्याचे सांगितले अमली पदार्थांची तपासणी करत असून पिशवी चेक करायचे आहे असे सांगितले आणि पिशवी चेक केल्यानंतर सोन्याची चैन आणि अंगठी हे सोने घालून फिरता असे सांगून ते चेक करायचे आहे असे सांगितले. त्यांनी अंगठी व चैन काढली आणि त्याने ती त्याच्याजवळ ठेवली. त्यानंतर दुसरा इसमाच्या गाडीवर बसून ते 31 ग्राम वजनाचे सोन्याची चैन, अंगठी घेऊन पळून गेले.

### गांजा प्रकरणी एकाला अटक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

800 मिलिग्रॅम वजन असलेला हायड्रो गांजा थायलंड येथून मित्रांच्या मदतीने छुप्या मार्गाने मागून बेकायदेशीर रित्या विक्री करता स्वतःच्या ताब्यात बाळगले प्रकरणी आरोपी केयूर जयेश गोगरी (राहणार सेक्टर 19 खारघर) याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात 30 ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.खारघर सेक्टर 19, शिवसाई बिल्डिंग, रूम नंबर 302 येथे राहणारा केयूर जयेश गोगरी हा त्याच्या घरामध्ये हायड्रो गांजा या अमली पदार्थाची विक्री करत असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी कक्ष गुन्हे शाखा यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. घरात अमली पदार्थ सापडले नाही. मात्र कारची झडती घेतली असता कार मध्ये एका पिशवीत हायड्रो गांजा सापडून आला. याप्रकरणी केयूर जयेश गोगरी याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# प्रभावी राजकीय प्रतिनिधित्वासाठी जैन युवकांनी एकत्र येणे ही काळाची गरज" - परमपूज्य प्रवीणऋषीजी महाराज

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

पुणे महानगरपालिका निवडणूक २०२५ च्या पूर्वतयारीच्या पार्श्वभूमीवर जैन समाजाचे संघटित आणि प्रभावी राजकीय प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने "पुणे सकल जैन समाज मेळावा" उत्साहात पार पडला. मेळाव्यास दीड हजार हून अधिक जैन अनुयायांनी हजेरी लावली.

हा मेळावा उपाध्याय प्रवर परमपूज्य प्रवीणऋषीजी महाराज यांच्या पावन सानिध्यात, अखिल भारतीय जैन अल्पसंख्यांक महासंघ यांच्या वतीने वर्धमान सांस्कृतिक भवन, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता.

या मेळाव्यात जैन समाजातील विविध संघटना, संस्था, ट्रस्टचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच असंख्य युवक-युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. समाजाच्या राजकीय



सहभागाची दिशा, एकजूट आणि आगामी निवडणुकांमधील जैन समाजाचा प्रभावी सहभाग या विषयांवर सखोल चर्चा झाली.

"जैन समाजाची संघटित शक्ती आणि युवकांचा सक्रिय राजकीय सहभाग हे समाजाच्या सशक्त भविष्यासाठी अत्यावश्यक आहे तसेच धर्मापेक्षा पक्ष मोठा नाही, जैन समाजातील जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणण्यासाठी पण सर्वांनी प्रयत्न करूया असल्याचे मत आयोजक आदिनाथ स्थानकवासी जैन ट्रस्ट चे अध्यक्ष अनिल नहार, जैन अल्पसंख्यांक महासंघ चे राष्ट्रीय महामंत्री संदीप भंडारी आणि प्रदेश वरिष्ठ उपाध्यक्ष महेंद्र सुंदेचा मुथ्था यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमात माजी मंत्री राजेंद्र बाबू दर्डा, विजय भंडारी, अभय छाजेड, अनिल नहार, इंदर छाजेड, सुनील लोढा, लक्ष्मीकांत खाबिया, बाळासाहेब ओसवाल, प्रविण चोरबोले, राजेंद्र बाटीया, हरेश शहा, प्रशांत देसरडा यांनी इच्छुक उमेदवारांना मार्गदर्शन केले.

मेळाव्यादरम्यान विविध राजकीय पक्षांतील जैन समाजातील सर्वपक्षीय इच्छुक उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली

भारतीय जनता पक्ष: महेंद्र सुंदेचा मुथा, प्रवीण चोरबोले, बाळासाहेब ओसवाल, आनंद छाजेड, भरत भुरट, विपेश सोनीग्रा, अरविंद कोठारी, प्रतीक देसरडा, राजू बाफना, कुंतीलाल चोरडिया, श्रीमल बेदमुथा, प्रकाश बाफना, प्रीती पाटील

काँग्रेस: भरत सुराणा, आनंद बाफना, योगिता सुराणा, अरुण कटारिया

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट): निलेश शहा, प्रशांत गांधी

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट): जया बोरा, सुवर्ण कोठारी

शिवसेना (एकनाथ शिंदे गट): रिषभ नानावटी

मनसे: ऋषभ सिंगवी

अपक्ष: निखिल मुनोत, हर्षदा मुनोत

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकाश बोरा, मयूर सरनोत, जिनेन्द्र कावेडिया, विनोद सोळंकी, अभिजीत शहा, सौरभ धोका, निमेश शहा, सागर लुनिया, ऋषिकेश शहा, संतोष बोरा, आनंद गादिया, पंकज बाफना यांनी परिश्रम घेतले.

प्रस्ताविक व सूत्रसंचालन संदीप भंडारी यांनी केले तर आभार प्रदर्शन महेंद्र सुंदेचा मु मुथ्था यांनी केले.

कार्यक्रमासाठी महत्त्वपूर्ण सहकार्य दिल्याबद्दल आदिनाथ स्थानकवासी जैन ट्रस्टचे विशेष आभार मानण्यात आले.

मेळाव्यातील वातावरण जैन समाजाच्या एकतेचा, संघटित शक्तीचा आणि आगामी निवडणुकांमध्ये प्रभावी प्रतिनिधित्व घडविण्याच्या दृढ निर्धाराचा साक्षीदार ठरले.

## टायगर ग्रुपचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉक्टर पहेलवान तानाजीभाऊ जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त अड्याळ येथील ग्रामीण रुग्णालयात फळ वाटप कार्यक्रम संपन्न

**टायगर ग्रुपचे पवनी तालुका अध्यक्ष संदीप नरुले यांचा पुढाकार**

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा -** पवनी तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय अड्याळ येथे टायगर ग्रुप या सामाजिक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष पैलवान तानाजी भाऊ जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त टायगर ग्रुप चे पवनी तालुका अध्यक्ष संदीप नरूले त्यांच्या पुढाकारातून रुग्णांना फळ वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आले.

फळ वाटपाचा कार्यक्रम टायगर ग्रुपचे नागपूर कार्याध्यक्ष

मोनु जांगड़े व चंदू वैद्य, बंडू चेटुले, ,सुधीर सारवे यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आले. सदर फळ वाटपाचा कार्यक्रम भंडारा ,पवनी ,अड्याळ



, तुमसर,कोंढा येथे घेण्यात आला.सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरता टायगर ग्रुप पवनी तालुका अध्यक्ष संदीप नरुले , ,सुभाष भानारकर, सुमित दिघोरे ,निकेश फुलूरकर, अवि मेश्राम, अमोल नरुले ,ओम चौधरी , निखिल डोंगरे,अविनाश चौधरी, प्रज्वल कोल्हे ,विशाल कामटे, यांनी सहकार्य केले.

## सपकळवाडीतील कब्बडी स्पर्धेत डोर्लेवाडी संघाचा प्रथम क्रमांक

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील सपकळवाडी येथे शनिवारी 01 नोव्हेंबर रोजी सपकळ वाडी मधील ज्योतिर्लिंग क्रीडा मंडळाने कब्बडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये एकूण 27 कब्बडी संघाने सहभाग नोंदविण्यात आला होता यामध्ये 55 किलो वजनी गटात प्रथम क्रमांक ईगल स्पोर्ट्स क्लब डोर्लेवाडी द्वितीय क्रमांक रुद्रप्रताप कबड्डी संघ सासवड तृतीय क्रमांक शंभुराजे क्रीडा मंडळ सराफवाडी संघाने पटकवला याक्रीडा स्पर्धेचे

उदघाटन श्री छत्रपती सह साखर कारखान्याच्या संचालिका मा.सौ सुचिता सपकळ व सरपंच सौ.रोहिणी सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी सपकळवाडी मधील शिवाजी सपकळ रविंद्र



सपकळ सुदर्शना भुजबळ शिवराज सपकळ अमित वाघमारे राहुल सपकळ युवा नेते तुषार सपकळ कुंदन सपकळ शुभम सपकळ महेश सपकळ मंगेश सपकळ निलेश सपकळ अमर सपकळ यांनी सर्व खेळाडू व प्रशिक्षक यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले यास्पर्धेत सहभागी संघाला चहा नास्ता जेवण देण्यात आले स्पर्धा बघण्यासाठी गावातील तरुण युवक महिलावर्ग जेष्ठ ग्रामस्थ यांनी गर्दी केली होती.

## गोरेगाव तालुक्यातील कमरगाव येथे बायको नखऱ्याची या तीन अंकी नाटकाचे ७ नोव्हेंबरला आयोजन

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**गोंदिया -** गोरेगाव तालुक्यातील कमरगाव येथे मंडई निमित्त नवयुवक एकता नाट्य मंडळ च्या वतीने ७ नोव्हेंबर 2025 ला रोज शुक्रवारला रात्री ९ वाजता बायको नखऱ्याची या तीन अंकी नाट्य प्रयोगाचे आयोजन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कमरगावच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेले आहे . या तीन अंकी नाटिकेचे नाद ओंकार नाट्यकला रंगभूमी साकोली वडसा येथील कलाकार सादरीकरण करणार असून या कार्यक्रमाचे उद्घाटन सोहळयाला गोंदिया भंडारा लोकसभा क्षेत्राचे खासदार प्रशांत पडोळे, माजी मंत्री तथा विद्यमानआमदार राजकुमार बडोले,माजी खासदार डॉ. खुशाल बोपचे, जी .डी .सी .सी .बँक संचालक दुर्गाप्रसाद ठाकरे, भाजप नेते नीलम हलमारे , भाजप नेते आनंद चंद्रिकापुरे या मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन मंडळाचे अध्यक्ष मा. गणेश भाऊ पारधी ,उपाध्यक्ष मुन्नालाल दमाहे , सचिव देवेंद्र(बंटी) कटरे ,कोषाध्यक्ष चेतलाल नागपुरे, मंच संचालक देवेंद्र(बंटी )रहांगडाले, संजय दमाहे, सहसचिव टीकेश टेंभरे इतर सदस्यगन यांनी केलेले आहे.




## महाविस्तार 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर...; नाशिक जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर

**दैनिक युवक आधार**
**मालेगाव**

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'एआय' तंत्रज्ञानावर आधारित आणि शेतकऱ्यांसाठी डिजिटल सल्लागार म्हणून महत्त्वाची भूमिका बजावत असलेले महाविस्तार एआय हे ॲप शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय ठरत आहे. या ॲपचा वापर करण्याकडे शेतकऱ्यांचा दिवसेंदिवस कल वाढत आहे.

आतापर्यंतच्या आकडेवारीनुसार हे ॲप वापरण्यात नाशिक जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आहे तर,नाशिक जिल्ह्याचा विचार करता मालेगाव तालुका अन्य तालुक्यांच्या तुलनेत सर्वात पुढे आहे. शेतकऱ्यांना सुलभ मार्गदर्शन लाभावे म्हणून कृषी विभागातर्फे महाविस्तार एआय हे ॲप विकसित करण्यात आलेले आहे. गेल्या २१ मेपासून हे ॲप कार्यान्वित झाले आहे. या ॲपद्वारे शेतकऱ्यांसाठी हवामान अंदाज, बाजार भाव, पीक नियोजन आणि कीड व रोग नियंत्रणासाठी कृषीविषयक माहिती मराठीमध्ये उपलब्ध करून दिली जात आहे. या ॲपमुळे आधुनिक शेती कशी करावी, पिकांसाठी कोणती खते व कीटकनाशकांचा वापर करावा आणि कोणती खते व कीटकनाशकांचा वापर टाळावा,याची माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध होते. त्यामुळे उत्पादन खर्चात बचत होतेच पण शेत पिकांच्या उत्पादन वाढीसाठी देखील मदत होत आहे.हवामान बदल, बाजारपेठेतील अस्थिरता व



**महाविस्तार एआय ॲप कसे मिळवावे ?**

**शेतकऱ्यांना वापर करण्याच्या दृष्टीने हे ॲप सुलभ व सोपे आहे. गुगल प्ले स्टोअरवर जाऊन महाविस्तार एआय ॲप डाउनलोड करता येते. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या ॲपचा वापर करावा म्हणून कृषी विभागातर्फे जनजागृती मोहीम राबवली जात आहे. शेतकऱ्यांनी या ॲपचा वापर करून कृषी क्षेत्रातील या डिजिटल क्रांतीत सहभागी व्हावे, असे आवाहन मालेगावचे तालुका कृषि अधिकारी भगवान गोर्डे यांनी केले आहे.**

योग्य माहितीच्या अभावामुळे शेतकऱ्यांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. या ॲपच्या माध्यमातून या समस्यांवर उपाययोजना करणे शक्य होत आहे. महाविस्तार एआय ॲपमधील चॅटबॉटद्वारे शेतकऱ्यांच्या प्रश्नांना संबंधित तज्ज्ञांकडून त्वरित उत्तरे दिली जातात. जसे की, एखाद्या पिकावरील रोगासाठी कोणती औषध फवारणी करावी किंवा अमुक प्रकारच्या मातीसाठी कोणते खत उपयुक्त ठरेल, यासारखे प्रश्न. या ॲपपद्वारे स्थानिक पातळीवरील उपलब्ध होणाऱ्या हवामान अंदाजामुळे शेतकऱ्यांना पेरणी, कापणी आणि खतांचा वापर यांचे नियोजन करणे सुलभ होते.

# सहस्रचंद्रदर्शन सोहळा : दुग्धयोगी रावसाहेब पाटील म्हस्के यांचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात संपन्न

**दुग्ध, सहकार आणि समाजकारणातील योगदानाचा मान्यवरांकडून गौरव**

**दैनिक युवक आधार**
**लोणी प्रतिनिधी**

**अहिल्यानगर :** दुग्धचळवळीचे प्रणेते, सहकार क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्तिमत्व आणि समाजकारणातील प्रेरणादायी नेता माननीय दुग्धयोगी श्री रावसाहेब पाटील म्हस्के यांच्या सहस्रचंद्रदर्शन सोहळ्याचा भव्य कार्यक्रम रविवार, दि. २ नोव्हेंबर २०२५ रोजी अतिशय उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला.

नाथाजी पाटील म्हस्के शैक्षणिक संस्थेच्या विद्या विकास पब्लिक स्कूलच्या प्रांगणात आयोजित या सोहळ्याला जिल्ह्यातील तसेच राज्यातील अनेक मान्यवर, सहकारी नेते, शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी, दूध उत्पादक, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या भव्य कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी महसूल मंत्री आमदार बाळासाहेब थोरात होते. प्रमुख उपस्थितीमध्ये मा. आ. दादाभाऊ कळमकर, खासदार निलेश लंके, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, खासदार राजाभाऊ वाजे, आमदार आशुतोष काळे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रयत शिक्षण संस्था सातारा मीनाताई जगधने, बिपीन कोल्हे, माजी आमदार बी. के. मुरकुटे, खा. भास्कर भगरे, डॉ. सुधीर तांबे, संदीप वर्पे, सचिनराव गुजर, दीपक साळुंखे, बाळासाहेब गायकवाड, वंदनाताई मुरकुटे, महेंद्र शेळके, करण ससाने, राजेंद्र फाळके, अरुण पाटील कडु, शालिनीताई विखे आदी मान्यवरांचा सहभाग होता.

या प्रसंगी नाथाजी पाटील म्हस्के यांच्या पुतळ्याचे अनावरण मा. बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते आणि मा. दादाभाऊ कळमकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी रावसाहेब म्हस्के यांच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी प्रवासाचा आढावा घेण्यात आला. बाभळेश्वर दूध संघाची स्थापना, दुग्धउद्योगातील योगदान, सहकारातून ग्रामीण भागाच्या प्रगतीसाठी केलेले प्रयत्न, रयत शिक्षण संस्थेमार्फत शिक्षणाचा प्रसार, तसेच क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांचा




सहभाग — या सर्व कार्याचा गौरव करण्यात आला.

**सहकार, संघर्ष आणि संस्कारांचा गौरव — रावसाहेब म्हस्के ठरले प्रेरणास्थान**

कार्यक्रमात उपस्थित सर्व मान्यवरांनी आपल्या भाषणातून रावसाहेब म्हस्के यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या व्यक्तिमत्वाचा बहुआयामी प्रकाश टाकला.आमदार आशुतोष काळे यांनी म्हटले की, "भाऊ (रावसाहेब म्हस्के) आणि कर्मवीर शंकरराव काळे यांचे नाते वडील-मुलासारखे होते. भाऊंनी दूध संघाचे चेअरमन झाल्यावर सहकार क्षेत्रात पहिले आईस्क्रीम प्लांट सुरू केले आणि देशभर श्रीराम आईस्क्रीमचे नाव गाजवले. आज त्यांच्या कार्याचा वारसा पुढील पिढ्यांनी जपला पाहिजे."

सुप्रिया सुळे यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या आणि रावसाहेब म्हस्के यांच्या कार्याचा गौरव करत म्हटले की, "त्यांनी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना केवळ आर्थिक नाही तर सामाजिक बळही दिले."

माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी आपल्या भाषणात म्हटले, "रावसाहेब म्हस्के यांनी दुग्ध व्यवसाय, सहकार चळवळ आणि शिक्षण क्षेत्रात दिलेले योगदान अतुलनीय आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आर्थिक बळकटी देत त्यांनी सहकाराचे सामर्थ्य दाखवून दिले. एकत्र कुटुंब परंपरा, सामाजिक बांधिलकी आणि प्रामाणिक नेतृत्व यामुळे ते सर्वांसाठी प्रेरणास्थान ठरले आहेत."

वक्त्यांनी सांगितले की, शरदचंद्रजी पवार साहेब या कार्यक्रमास उपस्थित राहणार होते, परंतु हवामानामुळे त्यांचा दौरा रद्द झाला. तरीही पवार साहेब आणि म्हस्के परिवारातील आत्मीय संबंध आजही तितकेच दृढ असल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

कार्यक्रमात रावसाहेब नाथाजी पाटील म्हस्के सहस्रचंद्रदर्शन सोहळा समितीच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

सत्कार सोहळ्यात उपस्थित कार्यकर्त्यांनी, दूध उत्पादकांनी आणि नागरिकांनी "दुग्धयोगी" या उपाधीला साजेशी कर्तृत्वगाथा असलेल्या रावसाहेब म्हस्के यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकाशवाणीचे सुप्रसिद्ध सूत्रसंचालक संतोष मते यांनी उत्तमरीत्या केले.शेवटी सर्व उपस्थित मान्यवरांनी रावसाहेब म्हस्के यांच्या दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करत त्यांच्या सहकार आणि सामाजिक कार्याचा वारसा पुढील पिढ्यांनी कायम ठेवण्याचा संकल्प केला.

या भव्य सोहळ्याला जिल्ह्यातील तसेच राज्यातील शेकडो कार्यकर्ते, दूध उत्पादक, सहकारी नेते, शिक्षक, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सहकार, संघर्ष व संस्कारांचा उत्सव एक ऐतिहासिक पर्व ठरला.